अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक १९७ I गुरूवार ३० एप्रिल २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ४२

### आपण आपल्या आत्म्याला जाणलं पाहिजे

आत्म्याला ओळखलं पाहिजे. खर तर म्हणजे जोपर्यंत आपण आपल्या आत्म्याला ओळखत नाही तोपर्यंत परमेश्वराच्या नावाने आपण काही जरी केलं तरी ते परमेश्वराला पोहोचत नाही. ज्याप्रमाणे या इन्स्ट्रमेंटला हे कॉईल लागलेलं आहे, ते जोपर्यंत मेन्सला लागत नाही तोपर्यंत माझा आवाज तुमच्यापर्यंत जाऊ शकत नाही. तसंच जोपर्यंत संबंध परमेश्वराशी लागत नाही, तुमच्या आत्म्याच्या द्वारे, तो पर्यंत परमेश्वर काय आहे, त्याच्या मूर्तीला काय अर्थ आहे, त्याच्या पूजनाला काय अर्थ आहे किंवा तुम्हालाच काय अर्थ आहे, हे काहीही कळू शकणार नाही. ही एक साधी गोष्ट आहे. उदाहरणार्थ आपला टेलिफोन असला आणि त्या टेलिफोनचा जर आपण संबंध मेनशी लावला नाही तर त्या टेलिफोनवर आपण कितीही टेलिफोन केले तरीसुद्धा आपल्याला काहीही उत्तर मिळणार नाही. आत्म्याची ओळख पहिल्यांदा झालीच पाहिजे. ते अत्यावश्यक आहे, फक्त मानवालाच अधिकार आहे, की आपल्या आत्म्याला जाणायचं.या आत्म्याला जाणण्याचा अधिकार फक्त मानवालाच मिळाला आहे. आजपर्यंत जे साधू-संत झाले त्या सर्वांनी फक्त आपला धर्म सांभाळलेला आहे. त्यांनी आपला धर्म सांभाळला की तुम्ही धर्मामध्ये संतुलन ठेवा. धर्मात बरोबर वागाल. आपल्या देशामध्ये इतके साधू-संत झाले. नानक, कबीर झाले, आता, आपल्या इथे तर फारच मोठमोठे संत झाले. ज्ञानेश्वर झाले, तुकाराम झाले. सगळे संसारातच राहिलेले लोक आहेत. जंगलात पळून त्यांनी काहीही केलेले नाही. सगळं संसारात कार्य केलेले आहे.

२५ फेब्रुवारी १९७९ पुणे अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# मविआत 'बिघाडी': विधान परिषदेवरून काँग्रेस-ठाकरे गटामध्ये ठिणगी!

## अंबादास दानवेंच्या एकतर्फी उमेदवारीमुळे काँग्रेस नाराज; शरद पवारांच्या भूमिकेकडे राज्याचे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/अहिल्यानगर :** राज्याच्या राजकारणात 'महाविकास आघाडी' (मविआ) एकसंध असल्याचे दावे केले जात असले, तरी आगामी विधान परिषद निवडणुकीने या आघाडीतील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आणला आहे. शिवसेनेच्या (ठाकरे गट) वतीने अंबादास दानवे यांची उमेदवारी एकतर्फी जाहीर करण्यात आल्याने काँग्रेस पक्षश्रेष्ठी कमालीचे संतप्त झाले आहेत. या 'एकतर्फी' वागणुकीला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने आता स्वतःचा उमेदवार रिंगणात उतरवण्याची तयारी सुरू केली असून, मविआमध्ये मोठी फूट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

विधानसभेच्या संख्याबळानुसार महाविकास आघाडी नऊपैकी केवळ एक जागा सुरक्षितपणे निवडून आणू शकते. या जागेसाठी काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने उद्धव ठाकरे यांनी लढावे, अशी इच्छा व्यक्त केली होती. मात्र, मित्रपक्षांना विश्वासात न घेता ठाकरे गटाने विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे नाव जाहीर केले. प्रत्येक वेळी शिवसेना अशीच वागणार असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका काँग्रेस नेत्यांनी घेतली आहे.



काँग्रेसने आता शरद पवारांच्या 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार' पक्षाकडे पाठिंब्यासाठी साकडे घातले आहे. राज्यसभेला काँग्रेसने शरद पवारांना बिनशर्त पाठिंबा दिला होता, तसेच त्यांच्या आग्रहाखातर बारामतीमधून उमेदवार मागे घेतला होता, याची आठवण काँग्रेसकडून करून दिली जात आहे. राष्ट्रवादीची १० मते आपल्या पारड्यात पाडून ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

काँग्रेसने या निवडणुकीसाठी आपली कंबर कसली असून, दिल्लीतून 'ए' फॉर्म मुंबईत पोहोचला आहे. श्रीनिवास बिक्कड हे काँग्रेस मुख्यालयातून हा फॉर्म घेऊन मुंबईकडे रवाना झाले आहेत. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे मुंबईतच 'बी' फॉर्म देणार असून, काँग्रेसचा अधिकृत उमेदवार कोण असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मविआतील 'फूट' आता अधिकृत?

**राज्यसभा निवडणुकीवेळी तिन्ही पक्ष एकत्र होते, मात्र विधान परिषदेच्या एका जागेने मविआतील एकीचे वाभाडे काढले आहेत. शरद पवार आता काँग्रेसला साथ देतात की ठाकरेंच्या शिवसेनेसोबत उभे राहतात, यावर मविआचे भवितव्य अवलंबून आहे. मित्रपक्षांमधील हा विसंवाद आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपातही अडथळा ठरू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**

विशेष संपादकीय...
करण नवले

### निष्ठेचा 'विवेक' आणि फळलेला 'शब्द'!

राजकारणात दिलेला शब्द पाळला जातो, तेव्हा कार्यकर्त्यांचा लोकशाहीवरचा आणि नेतृत्वावरचा विश्वास अधिक दृढ होतो. विवेक कोल्हे यांची विधान परिषदेवरील उमेदवारी हा केवळ एका तरुण नेत्याचा सन्मान नसून, तो त्याग, संयम आणि पक्षनिष्ठेचा झालेला गौरव आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात कोपरगावचा 'काळे-कोल्हे' संघर्ष हा पिढ्यानपिढ्यांचा. या संघर्षाने जिल्ह्याला अनेक राजकीय वळणे दिली आणि महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला दिशाही दिली. याच संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विवेक कोल्हे यांच्या गळ्यात विधान परिषदेची उमेदवारी टाकून एकाच वेळी अनेक राजकीय साध्य केली आहेत. विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिलेला शब्द फडणवीसांनी पाळला, हे जितके महत्त्वाचे; तितकेच विवेक कोल्हे यांनी 'महायुतीचा धर्म' पाळण्यासाठी आपल्या कट्टर राजकीय विरोधकाचा केलेला प्रचार आणि त्यातून सिद्ध केलेली आपली प्रगल्भता आज खऱ्या अर्थाने फळाला आली आहे.

विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे यांचे नातू आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. कोल्हे घराण्याचा वारसा हा केवळ सत्तेचा नसून तो जनसेवेचा आणि सहकाराचा आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत कोपरगावची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) गेल्यानंतर भाजप श्रेष्ठींनी विवेक कोल्हे यांना थांबण्याचा आदेश दिला. ज्या मतदारसंघात अवघ्या ४०० मतांनी हार-जीत ठरते, तिथे आपल्या कट्टर विरोधकाचा म्हणजेच आमदार आशुतोष काळे यांचा प्रचार करणे ही राजकीय 'अग्निपरीक्षा' होती. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवून विवेक कोल्हे यांनी तो आदेश मानला आणि महायुतीचा विजय सुकर केला. सव्वा लाख मतांनी झालेला तो विजय कोल्हे यांच्या प्रामाणिक साथीशिवाय शक्य नव्हता, याची दखल खुद्द फडणवीस आणि अमित शहा यांनीही घेतली होती. (पान २ वर)

## महत्त्वाचे..

### मस्साजोगात अश्विनी देशमुख यांचा पराभव

बीड : फक्त भावनेच्या आधारावर निवडणुका जिंकता येत नाहीत. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या जागेवर कुटुंबातीलच व्यक्ती निवडून येईल, असेही नेहमीच होईल याचीही शाश्वती नाही. दोन वर्षांपूर्वी निर्घृण हत्या झालेल्या संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा ग्रामपंचायत निवडणुकीत पराभव झाला.

माजी सरपंच संतोष देशमुख यांची ज्यापद्धतीने हत्या करण्यात आली, त्यावरून संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. सर्व समाजाला घेऊन जाणारा, मनमिळावू, विकासाची दृष्टी असलेले संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे सरपंचपदाची पोटनिवडणूक झाली. संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर निवडणूक बिनविरोध घेण्यासाठी प्रयत्न केले गेले. मात्र मागील निवडणुकीत संतोष देशमुख यांच्याकडून अवघ्या ९ मतांनी पराभूत झालेल्या स्वरूपानंद देशमुख यांनी पुन्हा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही लढत झाली.

मस्साजोग ग्रामपंचायतीमध्ये सुमारे दोन हजार २,२०० मतदार असल्याची माहिती मिळत आहे. यावेळी एकूण १७४४ मतदान झाले असल्याचे सांगितले जाते.

### बंगालमध्ये भाजप बहुमताच्या उंबरठ्यावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** विधानसभा निवडणुकीसाठी मतदान संपल्याने निकाल जाहीर होण्यापूर्वीच निकालाचे भाकीत करणाऱ्या एक्झिट पोलने राजकीय खळबळ उडवून दिली आहे. मॅट्रिझ एक्झिट पोलनुसार, पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे १५ वर्षांचे राज्य कोसळत असल्याचे दिसत आहे. या एक्झिट पोलनुसार, भाजप राज्यात बहुमताचा जादुई आकडा पार करेल असा अंदाज आहे.

**टीएमसीला फटका? १५ वर्षांनंतर सत्ताबदलाचा भूकंप**

मत्रिझे यांच्या मते, राज्यात भाजप आणि टीएमसी यांच्यात अटीतटीची लढत असून, भाजप बहुमताचा आकडा पार करण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जींच्या टीएमसीच्या जागा निम्म्याने कमी होऊ शकतात. मॅट्रिझ एक्झिट पोलनुसार, भाजपला १४६ ते १६१ जागा मिळू शकतात, तर टीएमसीला १२५ ते १४० जागा मिळू शकतात. डावे पक्ष आणि काँग्रेससह इतरांना ६ ते १० जागा मिळू शकतात. राज्यात बहुमतासाठी १४८ जागांचा जादूचा आकडा आहे.

भाजप केवळ आपल्या जागा वाढवण्यातच यशस्वी होताना दिसत नाही, तर आपल्या मतांच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ करून सत्ता मिळवण्याच्या तयारीतही दिसत आहे. भाजपला ४२ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे, तर टीएमसीला सुमारे ४० टक्के मते मिळतील असा अंदाज आहे. इतरांना १६ टक्क्यांहून अधिक मते मिळण्याची अपेक्षा आहे. मागच्या वेळी २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत टीएमसीने २१५ जागा जिंकल्या होत्या.

भाजपने ७७ जागा जिंकल्या होत्या. डाव्या आणि काँग्रेसची आघाडी शून्यावर आली. यावेळी, एक्झिट पोलने भाजपच्या जागांमध्ये मोठी वाढ (७७ वरून १४६-१६१) आणि टीएमसीच्या जागांमध्ये मोठी घट (२१५ वरून १२५-१४०) होण्याचा अंदाज वर्तवला आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. ४ मे रोजी मतमोजणी झाल्यावरच खरा निकाल कळेल. मात्र, या सर्वेक्षणामुळे राष्ट्रीय राजकारणात खळबळ उडाली आहे. (पान ४ वर)

# बारामती आणि राहुरीत महायुतीचाच डंका!

## एक्झिट पोलनुसार सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांचा विक्रमी विजय निश्चित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी मतदारसंघातही महायुतीचे वर्चस्व पाहायला मिळत आहे. भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांना ७८ ते ८३ टक्के मतदारांनी कौल दिल्याचे 'रिंगसाईड रिसर्च' च्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. त्यांना सुमारे १ लाख ४२ हजार ५०० मते मिळण्याचा अंदाज आहे.**

अहिल्यानगर: देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांसोबतच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन हायप्रोफाईल पोटनिवडणुकांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. २३ एप्रिल रोजी पार पडलेल्या मतदानानंतर आता एक्झिट पोलचे प्राथमिक अंदाज समोर आले असून, दोन्ही मतदारसंघांत महायुती एकतर्फी बाजी मारणार असल्याचे चित्र दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात सुनेत्रा पवार महायुतीच्या उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. 'रिंगसाईड रिसर्च' च्या एक्झिट पोलनुसार, बारामतीकरांनी सुनेत्रा पवारांना भरभरून साथ दिली असून त्यांना ९१ ते ९७ टक्के मतदान मिळण्याचा अंदाज आहे. तर 'रुद्र रिसर्च' च्या अंदाजानुसार, सुनेत्रा पवार २ लाखांहून अधिक मतांच्या विक्रमी मताधिक्याने विजयी होऊ शकतात.





राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रचारादरम्यान व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरताना दिसत आहे. अजितदादांना मतदानरूपी श्रद्धांजली वाहण्याची भावना बारामतीकरांच्या मनात आहे, हा त्यांचा दावा एक्झिट पोलच्या आकडेवारीवरून खरा ठरताना दिसत आहे.

दुसरीकडे, शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना अवघ्या ७ ते १४ टक्के (सुमारे २५,५०० मते) मतांवर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे. 'रुद्र रिसर्च'च्या अंदाजानुसार, अक्षय कर्डिले हे १ लाखापेक्षा जास्त मताधिक्याने विजयी होऊ शकतात.

या दोन्ही जागांवर निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीच्या नेत्यांनी जोरदार प्रयत्न केले होते, मात्र विरोधी पक्षांनी उमेदवार दिल्याने ही लढत पार पडली. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, विरोधकांचे हे आव्हान मतदारांनी धुडकावून लावत पुन्हा एकदा महायुतीच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवला आहे.

### विधानपरिषद दिली तर शिंदेंचा पाईक म्हणून काम करु : बच्चू कडू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** फॉर्म माझ्या बॅगेत, विधानपरिषद दिली तर एकनाथ शिंदेंचा पाईक म्हणून काम करु...पण आमच्यासाठी दिव्यांग बांधव आमच्यासाठी महत्वाचे आहे. शेतकरी मजूर आमच्यासाठी आई-वडिलांसारखे आहेत. पदासाठी युती करणारा बच्चू कडू नाही. मुद्यांसाठी युती करणारे आहोत. नुसत्या आमदारकीसाठी बच्चू कडू जाईल एवढा नालायक नाही, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांनी दिली.



शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी बच्चू कडू यांच्या नावाची शिवसेनेकडून चर्चा सुरु होती. तसेच विधान परिषदेवर जायचं असल्यास प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन करा, अशी अट शिवसेनेने बच्चू कडूंना घातल्याची माहितीही समोर आली होती. या सगळ्या चर्चांनंतर आज बच्चू कडू यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले, १ लाख पेक्षा जास्त सदस्य प्रहार संघटनेचे आहे. शिवसेनाच्या बंडखोरीतून प्रहार संघटना समोर आली. मी एकमेव माणूस आहे की, मी कुणाला पाठिंबा नव्हता, ना कधी पाठिंबा घेतला. विलनिकरणाची चर्चा बघितली, वाईट वाटलं. बातमीतून बातमी तयार झाली आहे, असं बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं. विधानसभेच्या निवडणुकीत पराभव झाला तरी आम्ही थकलो नाही. भाजपसोबत जाण्याचा निर्णय माझा मतदारांना आवडला नाही. गोतावळा (पान ४ वर)

# श्रीरामपूरच्या भूमीत 'डीआरडीओ'चा महाप्रकल्प

## शेतकऱ्यांचा विरोधाचा एल्गार : उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोगशाळेचा प्रस्ताव

### संरक्षण मंत्रालयाकडून १५०० एकर जमिनीच्या संपादनाला हिरवा कंदील; २४० कोटींची मिळणार नुकसानभरपाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील हरेगाव येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मळ्यावर आता भारतीय संरक्षण दलाच्या शक्तीचे दर्शन घडणार आहे. भारत सरकारच्या संरक्षण संशोधन आणि विकास विभागाच्या (डीआरडीओ) वतीने येथे 'उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोगशाळा' आणि



तंत्रज्ञान विकास केंद्र स्थापन होणार आहे. केंद्र सरकारने यासाठी १५०० एकर जमीन अंदाजे २४० कोटी रुपयांना संपादित करण्यास मंजुरी दिली असून, भूमी अभिलेख विभागाकडून नकाशा व सातबारा उतारे मागवण्यात आले आहेत. मात्र, या निर्णयामुळे गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या जमिनीच्या प्रतीक्षेत असलेल्या 'आकारी पडित' शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, त्यांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शविला आहे.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव मळ्यावरील गट क्रमांक १ मधील १५०० एकर जमिनीची निवड केली आहे. येथे उच्च दर्जाची प्रयोगशाळा उभारण्यात येणार असून, यामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे. या प्रकल्पामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि पायाभूत सुविधांचा विकास होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. शेती महामंडळाला या जमिनीच्या मोबदल्यात रेडीरेकनरनुसार २४० कोटी रुपये मिळणार आहेत.

प्रकल्प स्वागतार्ह असला तरी, 'शेती महामंडळाच्या जमिनीवर पहिला हक्क मूळ वारसांचा (आकारी पडित शेतकरी) आहे,' अशी आक्रमक भूमिका शेतकरी संघटनेने घेतली आहे. संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने झाली आहेत. जोपर्यंत आकारी पडित शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनींची मोजणी करून त्या मूळ वारसांना दिल्या जात नाहीत, तोपर्यंत तेथे कोणालाही पाय ठेवू देणार नाही, असा इशारा ॲड. काळे यांनी दिला आहे. (पान ४ वर)

### आमचा प्रकल्पाला विरोध नाही, पण...

**महसूल मंत्र्यांनी मंत्रालयातील बैठकीत स्पष्ट आश्वासन दिले आहे की, आधी वारसांच्या जमिनींची मोजणी होईल. मगच उर्वरित जमीन उद्योगांना दिली जाईल. हा निर्णय होण्यापूर्वीच जर भूसंपादन झाले, तर शेतकरी तीव्र संघर्ष करतील.**

-ॲड. अजित काळे
(राज्य उपाध्यक्ष, शेतकरी संघटना)

### प्रशासकीय हालचालींना वेग:

**शेती महामंडळाच्या पुणे मुख्यालयातील अधीक्षक संजय शिंदे यांनी सांगितले की, डीआरडीओच्या अध्यक्षांनी या जमिनीचा स्वाक्षरी केलेला नकाशा आणि ७/१२ उतारे मागवले आहेत. यामुळे आता हा संघर्ष 'संरक्षण विकास विरुद्ध शेतकरी हक्क' असा होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

## संपादकीय...

# निष्ठेचा ‘विवेक’ आणि फळलेला ‘शब्द’!

(पान १ वरून...)

**भारतीय जनता पक्षात काम करताना अनेकदा मोठ्या नेत्यांच्या सावलीत स्वतःचे अस्तित्व हरवण्याची भीती असते. मात्र, विवेक कोल्हे यांनी जिल्ह्यात विखे पाटील घराण्याशी जुळवून घेतानाच आपले स्वतंत्र राजकीय वलय जपले. 'गणेश' सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत त्यांनी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सहकार्याने मिळवलेला विजय हा त्यांच्या राजकीय मुत्सद्दीपणाचे उत्तम उदाहरण आहे. केवळ सत्ता असतानाच नव्हे, तर गेल्या सात–आठ वर्षांपासून हातात सत्ता नसतानाही त्यांनी आपला गट आणि गड दोन्ही मजबूत ठेवले. शिर्डीतील साई संस्थान कामगार सोसायटीच्या निवडणुकीत त्यांच्या पॅनेलने घेतलेली आघाडी त्यांच्या जनसंपर्काची पावती देते.**

**विवेक कोल्हे यांच्या कामाची दखल केवळ राज्याच्या नव्हे, तर केंद्राच्या स्तरावरही घेतली गेली. त्यांच्याच पुढाकारातून कोपरगावात सहकार क्षेत्रातील देशातील पहिला 'सीएनजी' प्रकल्प कार्यान्वित झाला. या प्रकल्पाच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्वतः कोपरगावात हजेरी लावली होती. त्यावेळी कोल्हे यांनी केलेले जोरदार शक्तिप्रदर्शन आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन पाहून अमित शहा प्रभावित झाले होते. त्यानंतर कोपरगाव पालिकेची निवडणूक जिंकून त्यांनी पक्षाला दिलेले 'गिफ्ट' त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब करणारे ठरले. फडणवीसांच्या माध्यमातून झालेली अमित शहांची दिल्लीतील भेट ही कोल्हे यांच्या राजकीय कारकिर्दीतील 'टर्निंग पॉईंट' ठरली.**

**अहिल्यानगर जिल्ह्याच्या भाजपमधील अंतर्गत राजकारणात अनेक सत्ताकेंद्रे आहेत. विवेक कोल्हे यांच्या निवडीमुळे केवळ कोपरगावच नव्हे, तर जिल्ह्याच्या राजकारणात समतोल साधण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. विवेक कोल्हे हे फडणवीसांच्या 'गुडबुक'मधील नेते मानले जातात. प्रत्येक राजकीय चढ–उतारात त्यांनी आपल्या नेतृत्वाशी असलेली निष्ठा जपली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिर्डीत बोलताना आम्ही कोल्हे यांना शब्द दिला आहे, असे विधान केले होते. 'राष्ट्र सह्याद्री'ने त्यावेळी व्यक्त केलेला अंदाज आज अधिकृत घोषणेनंतर सत्यात उतरला आहे.**

**विवेक कोल्हे हे एक आक्रमक आणि अभ्यासू युवा नेते म्हणून ओळखले जातात. सहकार, शेती, आणि ग्रामीण विकासाची त्यांना असलेली जाण ही विधान परिषदेत महत्त्वाची ठरेल. आशुतोष काळे आणि विवेक कोल्हे या दोन तरुण नेत्यांमधील समन्वय हा कोपरगावच्या विकासासाठी फायदेशीर ठरू शकतो. मात्र, आता कोल्हे यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. त्यांना केवळ कोपरगावपुरते मर्यादित न राहता, जिल्ह्याच्या आणि राज्याच्या प्रश्नांवर आपली छाप पाडावी लागेल.**

**राजकारणात 'नेत्याचा शब्द' आणि 'कार्यकर्त्याची निष्ठा' यांचा संगम दुर्मिळ असतो. विवेक कोल्हे यांच्या उमेदवारीने तो संगम पाहायला मिळाला. अहिल्यादेवींच्या भूमीत जलक्रांती आणि ग्रामीण विकासाची पंचसूत्री घेऊन काम करणाऱ्या या तरुण नेत्याला आता राज्याच्या विधीमंडळात आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची मोठी संधी मिळाली आहे. राज्याच्या राजकारणात एक दखलपात्र चेहरा म्हणून विवेक कोल्हे यांचा उदय झाला असून, त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे, यात शंका नाही.**

# भंडारदरा पाणीचोरी प्रकरणी शासनाला उच्च न्यायालयाचे कठोर निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** भंडारदरा धरणाच्या पाणीवाटपातील कथित चोरी व नादुरुस्त पाणीमापक यंत्रणांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनाला कठोर निर्देश दिले आहेत. एस.डब्ल्यू.एफ. पाणीमापक यंत्रणेला १५ दिवसांत परवानगी देऊन एका महिन्याच्या आत ती पूर्णपणे कार्यान्वित करावी, तसेच पाणी लेखापरीक्षण करून नव्याने शपथपत्र सादर करावे, असे आदेश न्यायालयाने दिले.

भंडारदरा धरणातून कालव्यांच्या माध्यमातून सुमारे ५७ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळतो. धरणाची साठवण क्षमता ११ टीएमसी असून दरवर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरते. मात्र, लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, शहरीकरण तसेच बंद पडलेल्या संस्था व कारखान्यांना दिलेले पाणी परवाने यामुळे पाणीवाटपात अनियमितता होत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

या संदर्भात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व युवराज औताडे यांच्या वतीने ॲड. अजित काळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकेत पाण्याचे ऑडिट, बंद संस्थांचे परवाने रद्द करणे आणि पाणीमापक यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली होती.

न्या. नितीन सूर्यवंशी व न्या. वैशाली जाधव–पाटील यांच्या खंडपीठाने शासनाला तीन आठवड्यांत नव्याने शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले असून पुढील सुनावणी जून २०२६ मध्ये होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



(छाया–सुधीर चव्हाण नेवासा)

# पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिरास संपादक करण नवले यांची सपत्नीक भेट

**नेवासा(प्रतिनिधी) :**लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व खंडोबा देवाची सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिरास दैनिक राष्ट्र सहयाद्रीचे संपादक करण नवले व त्यांच्या पत्नी कार्यकारी सौ. पूनमताई नवले यांनी सपत्नीक भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी पुरातन मंदिर जीर्णोद्धार समितीचे प्रमुख व नेवासा बुद्रुक येथील राष्ट्र सहयाद्रीचे प्रतिनिधी संभाजीराव ठाणगे यांनी म्हाळसा खंडोबा बानाईची प्रतिमा व सन्मानचिन्ह देऊन संपादक करण नवले व सौ.पूनमताई नवले यांचा देवस्थानच्या वतीने सन्मान केला.प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांनी म्हाळसा देवी अवतार कार्य,खंडोबादेवाच्या सासूरवाडी नेवासा बुद्रुक या तिर्थक्षेत्राविषयी माहिती दिली.

इ.स.बाराव्या शतकातील असलेल्या नेवासा बुद्रुकच्या पुरातन खंडोबा म्हाळसा बाणाई मंदिराचा जीर्णोद्धार समितीने गावकऱ्यांसह भाविकांच्या सहकार्यातून जीर्णोद्धार करून मंदिराचे जतन व संवर्धन केल्याचे पाहून आनंद वाटला. जीर्णोद्धाराचे काम देखील सर्वांनी एकत्रित येत चांगल्या पध्दतीने लोकसहभागातून केले आहे.अशा ऐतिहासिक मंदिराच्या कार्याला गती मिळण्यासाठी शासनाने सहकार्य केल्यास अधिकाधिक भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध होऊन हे क्षेत्र देखील नावारूपास येईल त्यासाठी आपण मार्गदर्शन करत राहू अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली.

यावेळी जीर्णोद्धार समितीचे सदस्य राजेंद्र काशीद बाळू फसले,ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे लेखक सच्चिदानंद बाबांचे वंशज राजेंद्र थावरे,शांताराम बोर्डे,राष्ट्र सह्याद्रीचे सरताज सय्यद,म्हाळसा खंडोबा बाणाई पुरातन मंदिर जीर्णोद्धार समिती नेवासा बुद्रुकचे सेवेकरी सदस्य यावेळी उपस्थित होते.



# संजीवनी युवा प्रतिष्ठानकडून पशू पक्षांसाठी अन्न पाण्याची सोय

## विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांचा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. संजीवनी प्रतिष्ठानच्या युवा सेवकांच्या माध्यमातून कोपरगाव शहरात भीषण पडलेल्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची तर पक्षांसाठी बर्ड्स वॉटर फीडरची व्यवस्था करून देण्यात आली असून कोपरगावकरांनी या कौतुकास्पद उपक्रमाचे स्वागत केले आहे.

सोमवार (दि.२७) एप्रिल रोजी युवा नेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत शहरांत मुक्या जनावरांना पाण्याची तर पक्ष्यांसाठी बर्ड्स फीडर्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

सध्या सर्वत्र ४० ते ४५ डिग्री सेल्सिअसपर्यंत तापमानाची वाढ झाल्याने मुक्या जनावरांसाठी पाण्याची गरज अधिक अधोरेखित झाली आहे. नागरिकांसोबतच मुक्या प्राण्यांनाही उन्हाच्या झळा सहन कराव्या लागत असल्याने संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील विविध भागांत जनावरांसाठी पाण्याची तसेच पक्ष्यांसाठी फीडर्सची सोय करण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत शहरात सुमारे १०० ठिकाणी बर्ड्स फीडर्स बसविण्यात आले असून ठिकठिकाणी पाण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे भर उन्हाळ्यात मुक्या जनावरांना पाणी तर पक्षांसाठी अन्न उपलब्ध होणार आहे. तसेच पक्षांसाठी लावण्यात आलेल्या फीडर्सची देखभाल करण्याची जबाबदारी शहरातील व्यापारी व नागरिकांनी स्वीकारली असून ते नियमितपणे पाणी व अन्न उपलब्ध करून देणार आहेत.या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला असून नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत विवेक कोल्हे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी कोपरगाव शहरातील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तसेच संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजार समितीची उपशाखा नसल्याने व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची अडवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** राहाता तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठे गाव म्हणून ओळख असलेल्या तसेच शेतकरी संपामुळे चर्चेत आलेल्या पुणतांबा व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना सध्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. गावात कृषी उत्पन्न बाजार समितीची उपशाखा नसल्याने शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी कोपरगाव, राहाता, वैजापूर किंवा श्रीरामपूर येथील बाजार समित्यांमध्ये जावे लागत आहे.

पुणतांबा येथे बाजार समितीची उपशाखा सुरू करावी, अशी मागणी येथील शेतकरी वर्गाकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. मात्र, अद्याप त्याची दखल घेतली गेलेली नाही. त्यामुळे परिसरातील खाजगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या माल खरेदीवेळी अडवणूक होत असल्याची तक्रार आहे. माल चांगला नाही, माती आहे, फुटलेला आहे अशा कारणांवर अत्यल्प दराने माल खरेदी केला जातो. काही व्यापारी तत्काळ पैसे देतात, तर काही व्यापारी पेमेंटसाठी शेतकऱ्यांना वारंवार हेलपाटे मारायला लावतात. पुणतांबा–गोंडेगाव रस्त्यावरील एका व्यापाऱ्याने माल खरेदी केल्यानंतर १५ दिवसांनी दोन टप्प्यांत पैसे दिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय माल खरेदी करताना विविध वजावटी केल्या जात असल्याचीही तक्रार आहे. त्यामुळे पुणतांबा परिसरात कृषी उत्पन्न बाजार समितीची उपशाखा तातडीने सुरू करून शेतकरी वर्गाला न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

# झाडांची संख्या घटल्याने उष्णतेचा कहर वाढला ; पारा वाढला ४३ अंश वर पोहोचला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील पश्चिमेला असलेले सर्व परिसरात व वन विभागत झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे यंदा उन्हाचा तडाखा अधिक तीव्र जाणवत आहे. गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड, वाढती बांधकामे आणि दुर्लक्षित वृक्षलागवड यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. परिणामी तापमानात लक्षणीय वाढ झाली असून नागरिकांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कडेने वृक्ष लागवड करण्यात आली होते एअरटेल व जिओ ची केबल टाकताना सर्व झाडे काढुन घेतले गेले काही ठिकाणी नवीन वृक्ष लागवड केले आहे त्याकडे ही सामाजिक वनीकरणचे दुर्लक्ष असल्यामुळे त्या ही झाडे नष्ट झाली आहे . यामुळे दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत.

# कोपरगाव आगाराला नवीन बस द्या

## आमदार आशुतोष काळे यांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव बस आगारातील बसेसची संख्या कमी झाल्याने तसेच काही बसेस जुना झाल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्यासाठी कोपरगाव आगाराला तातडीने नवीन बस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

आमदार काळे यांनी मुंबई येथे मंत्री सरनाईक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. कोपरगाव हे शिर्डी, मनमाड, वैजापूर, श्रीरामपूर, संगमनेर व नाशिक या शहरांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असून शिर्डी तीर्थक्षेत्रामुळे येथे प्रवाशांची मोठी वर्दळ असते. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी व भाविकांसाठी कोपरगाव बसस्थानक महत्त्वाचे केंद्र आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार,



२०१९ पूर्वी आगारात ९० बसेस कार्यरत होत्या. सध्या ही संख्या ७२ वर आली असून त्यातील ८ बसेस १३ वर्षांहून अधिक जुन्या आहेत. त्यामुळे फेऱ्या वेळेवर होत नाहीत तसेच तांत्रिक बिघाडामुळे बसेस रस्त्यात बंद पडतात. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील नागरिक व विद्यार्थ्यांना बसत आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा–महाविद्यालयात पोहोचता येत नसून अनेकदा धोकादायक पद्धतीने प्रवास करावा लागतो. याची दखल घेत परिवहन मंत्री सरनाईक यांनी नवीन बसेस देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आमदार काळे यांनी सांगितले.

# आ. गायकवाड, धीरेंद्र शास्त्रीविरोधात श्रीरामपूरात ‘भाकप’चे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारताचा कम्युनिस्ट (माले) पक्षाच्या वतीने श्रीरामपूर तहसील कार्यालयासमोर तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. कॉम्रेड गोविंद पानसरे यांचा अवमान करत प्रकाशक कॉ. प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करणाऱ्या आ. संजय गायकवाड यांच्या वक्तव्यांचा निषेध करण्यात आला. यासोबतच धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या कथित अपमानास्पद विधानांबाबतही संताप व्यक्त करण्यात आला. तसेच बुलढाणा येथे आ. संजय गायकवाड विरोधात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर झालेल्या दडपशाहीचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी तहसीलदार मिलिंद वाघ यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. महापुरुषांचा अपमान चालणार नाही, दडपशाहीचा निषेध असो, आम्ही सारे पानसरे अशा घोषणा देण्यात आल्या. ऐतिहासिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. प्रसंगी तीव्र संघर्ष करण्याचा यावेळी इशारा देण्यात आला. यावेळी आंदोलनात प्रमुख मागण्या– आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करून तात्काळ आमदारकीचा राजीनामा घ्यावा, धीरेंद्र शास्त्री यांच्यावर तात्काळ कायदेशीर



कारवाई करावी, बुलढाणा येथील आंदोलकांवरील दडपशाहीची चौकशी करावी, राज्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य व सामाजिक सलोखा राखण्यासाठी ठोस भूमिका जाहीर करावी. आदि मागण्या करण्यात आल्या.

यावेळी कॉ. जीवन सुरुडे, कॉ. राजेंद्र बावके, कॉ. श्रीकृष्ण बडाख यांची भाषणे झाली. या निषेध आंदोलनात कॉ. बाळासाहेब सुरूडे, कॉ. शरद संसारे, कॉ. मदिना शेख, कॉ. उत्तम माळी, प्रकाश भांड, राहुल दाभाडे, अरुण बर्डे, अनिल गायकवाड, बाबूलाल पठाण, गोरक्षनाथ रोहन, संदीप राखपसरे, दीपक शेळके, राहुल मेहत्रे, अस्लम शेख, दिगंबर दळवी, अमोल मरसाळे, योगेश शेलार, दिनेश तुसांबड, दादा शेलार, अशोक गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.



**मुंबईचे राज्य उपाध्यक्ष अवधूत चव्हाण साहेब व त्यांचे सहकारी ,जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, म.न. विद्यार्थी सेनेचे राज्य कार्यकारणी सदस्य किरण शिंदे, व इतर मनसे सैनिक उपस्थित होते.**

# संतोष गव्हाणे व यश गव्हाणे मनसे योध्दाउपाधीने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शहर मनसेचे उत्तर अहिल्यानगर चे जिल्हा उपाध्यक्ष संतोष गव्हाणे व त्यांचे चिरंजीव विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष यश गव्हाणे यांनी कोरोनाच्या काळात,जनतेस मदत,तरुणांना रोजगार,नेवासा येथे पक्षाचा प्रसार सामाजिक कार्य आंदोलने व जनजागृती उल्लेखनीय कार्य केले सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत माहिती पोहचवुन पक्षाचे उल्लेखनीय कामाची दखल घेत अहिल्यानगर जिल्हयाचे मनसेचे जिल्हा संपर्क नयन कदम यांच्या हस्ते गौरव प्रमाणपत्राद्वारे मनसे योध्दा उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष स्थापनेपासून ते आज पर्यंत विविध कार्य ,अनेक आंदोलने, कोरोनाच्या काळात केलेली जनसेवा सामाजिक कार्य जनतेच्या विविध प्रश्नांसाठी केलेल आंदोलने प्रशासनाला जाग यावी यासाठी सोशल मीडिया युट्युब फेसबुक वर रेल बनवून जनजागृतीची संदेश दिला प्रशासनाला जाग आणून दिली.

सोशल मीडियाद्वारे तिर्थक्षेत्रांचे व्हिडिओच्या माध्यमातून जनतेपर्यंत माहिती पोहोचवली. पक्षाचा प्रसार करणे अशा विविध कार्याची दखल घेऊन मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष गव्हाणे व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहरराध्यक्ष यश संतोष गव्हाणे यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे सरचिटणीस व अहिल्यानगर जिल्हयाचे संपर्क प्रमुख श्री नयन कदम यांच्या हस्ते मनसे योध्दा गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# आश्वी खुर्द ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत साक्षी देशवंडीकर यांचा विजय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील तसेच शिर्डी विधानसभा मतदारसंघातील आश्वी खुर्द ग्राम पंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील पोटनिवडणुकीत ना. राधाकृष्ण विखे गटाच्या साक्षी सिद्धार्थ देशवंडीकर यांनी विजय मिळवत ग्रामपंचायतीत आपला झेंडा रोवला.

या निवडणुकीत माजी आ. बाळासाहेब थोरात गटाने शेवटच्या टप्प्यापर्यंत जोरदार लढत दिल्याने निवडणुकीत चांगलीच रंगत निर्माण झाली होती. मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी झालेल्या मतदानात प्रभाग क्रमांक २ मध्ये एकूण ६१७ मतदान झाले. त्यामध्ये साक्षी देशवंडीकर यांना ३३१ मते, पूजा गायकवाड यांना २७६ मते, तर १० मते नोटाला पडली. त्यामुळे साक्षी देशवंडीकर या ५५ मतांनी विजयी ठरल्या. या विजयासाठी विखे गटाकडून विखे पाटील कारखान्याचे संचालक अनिल भोसले, प्रवरा फळे भाजीपाला सोसायटी प्रवरानगरचे चेअरमन मकरंद गुणे, माजी संचालक



डॉ. दिनकर गायकवाड, बाळासाहेब मांढरे, प्रवरा बँकेचे संचालक बापुसाहेब गायकवाड, बापुसाहेब निवृत्ती गायकवाड यांनी नेतृत्व केले. तर थोरात गटाचे नेतृत्व विठ्ठल उर्फ तात्यासाहेब गायकवाड यांनी केले. साक्षी देशवंडीकर यांच्या विजयाबद्दल ना. राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे, डॉ. राजेंद्र विखे, शालिनीताई विखे, धनश्रीताई विखे, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, माजी जिल्हा परिषद सदस्य आण्णासाहेब भोसले, कांचनताई मांढरे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

## विकासाच्या बाजूने मतदारांचा कौल

**गेल्या पाच दिवसांपासून गावातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, जनसेवा कार्यालय, प्रवरा उद्योग समूहातील विविध विभागांचे कर्मचारी, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, दूध संस्थेचे पदाधिकारी आणि तरुण वर्ग महीला वर्ग यांनी एकत्रितपणे परिश्रम घेतले. मतदारांनी विकासकामांच्या पाठीशी उभे राहत पुन्हा एकदा ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. पुढील काळात गावातील विकासकामांना अधिक गती देण्यात येईल, असा विश्वास सरपंच सौ. अलकाताई बापुसाहेब गायकवाड यांनी व्यक्त केला.**

# सद्‌गुरू नारायणगिरी महाराज आश्रमातील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

## भगवंतांच्या नामस्मरणासाठी मनाची एकाग्रता हा मूळ पाया : महंत उद्धव महाराज मंडलिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बुदुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सद्‌गुरू नारायणगिरी महाराज आश्रमात सद्‌गुरू नारायणगिरी महाराजांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. भगवंतांच्या नामस्मरणासाठी मनाची एकाग्रता हा मूळ पाया असल्याने जीवनामध्ये अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीत ही नामस्मरण हे निरंतरपणे घेण्याचा प्रयत्न करा असे आवाहन आश्रमाचे प्रमुख महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी यावेळी बोलतांना केले.



ब्रम्हलीन सद्‌गुरु नारायणगिरी महाराजांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित अखंड हरीनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये काल्याच्या कीर्तनप्रसंगी गुरुवर्य उद्धवजी महाराज मंडलिक यांनी कंठी धरीला कृष्णमणी श्र अवघा जनी प्रकाश श्रश्र या अभंगावर सुंदर निरूपण केले.ते पुढे म्हणाले की भगवान श्रीकृष्णाने केलेला काला हा अध्यात्माच्या पूर्णत्वाचा प्रसाद आहे. जीवनामध्ये विशेष अनुभूती घेण्यासाठी काही साधना व सेवा करावी लागते. मनशांतीसाठी, ज्ञानप्राप्तीसाठी, समाधान स्थिती प्राप्त होण्यासाठी साधना फार महत्त्वाची आहे.

हरीकथा,नामघोष,नामस्मरण यामधून मानवी जीवाला समाधान मिळते परंतु यासाठी मानवी मनाची निरंतरता फार महत्वाची आहे. मनुष्य जीवाला संसाराच्या तापातून थकलेल्या मनाला ग्रंथ,मठ,मंदिर,तीर्थक्षेत्र यातून नवीन ऊर्जा मिळते. आपण सर्वजण ईश्वर स्वरूप आहोत. मायेचा अडसर दूर झाला की भगवंताची प्राप्ती होते. शेतकरी व संन्यासी यामध्ये दोघांची पुण्य सारखेच असते. आज राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांची अवस्था बिकट केली आहे.



कारण शेतकऱ्यालाही शेतीमध्ये तपच करावे लागते. तेव्हा शेतीमधून उत्पन्न मिळते. परंतु त्याच्या शेतमाला हवा तसा बाजार भाव मिळत नसल्याची खंत त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचा हा उत्सव सर्वांच्या सहकार्याने अतिशय सुंदररित्या संपन्न झाला. पंचक्रोशीतील गावांनी भरभरून भाकरी प्रसाद दिला. ज्येष्ठांची नियोजन, तरुणांचे श्रम यामुळे सप्ताह संपन्न करण्यात कोणतेही अडथळे आले नाही. पुढील वर्षी सद्गुरु आश्रमाचा तप:पूर्ती सोहळा संपन्न होणार आहे व यासाठी सर्वांच्या तन, मन, धनाच्या सहभागातून हा उत्सव आदर्शवत करण्याचा मानस गुरुवर्य उद्धव महाराज यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला.

कीर्तनानंतर वेगवेगळ्या प्रकारची सेवा देणाऱ्या दात्यांचा गुरुवर्य श्री उद्धवबाबांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. आश्रमाचे शिक्षक संतसेवक बाळासाहेब झिने सरांनी सूत्रसंचालन केले. या प्रसंगी महाराष्ट्रातील मान्यवर कीर्तनकार, गायनाचार्य,मृदूंगाचार्य, भजनी मंडळी, वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, पत्रकार बांधव, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठेकेदारावर कारवाईची शेतकऱ्यांची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील शेतकऱ्यांनी प्रवरा नदीवरून शेतीसाठी पाणी आणण्याच्याउद्देशाने मोठ्या आर्थिक संकटावर मात करत तब्बल ९ ते १० किलोमीटर लांबीची पाईपलाईन उभारली होती. या पाईप लाईनसाठी योजनेसाठी शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले, तर काहींनी दागदागिने गहाण ठेवून कोट्यवधी रुपयांचा खर्च केला होता. मात्र आता महावितरणच्या कामासाठी केबल टाकणाऱ्या ठेकेदारामुळे ही पाईप लाईन फुटल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे करत संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पुणे-नाशिक बायपास महामार्गा लगत असणाऱ्या खांडगाव रोडखाली इलेक्ट्रॉनिक केबल टाकण्याचे काम महावितरण च्या ठेकेदारामार्फत सुरू होते.

यावेळी होलपास घेत असताना ठेकेदाराकडून दहा केजी सहा इंची अशा तब्बल ५पाईपलाईन फोडण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनी संबंधित ठेकेदाराशी जवळपास दोन महिने वारंवार संपर्क साधून नुकसान



भरून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर महावितरण ठेकेदाराकडून देण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे दिले असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून लाखो रुपये खर्च करून पाईपलाईन दुरुस्त केली. मात्र विद्युत मोटार सुरू केल्यानंतर पाईपलाईनचे पाईप अनेक ठिकाणी चिरण्यास व फुटण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे पाईप देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संतप्त शेतकऱ्यांनी केला आहे.

# विज्ञानाच्या क्षितिजावर 'ध्रुवतारे' चमकले!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : विज्ञानाची कास धरुन संशोधक वृत्ती जोपासणार्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणार्या 'डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा' परीक्षेत संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत ध्रुवच्या तीन विद्यार्थ्यांनी सुवर्ण आणि रौप्य पदकांवर आपले नाव कोरीत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत इयत्ता सहावीतील आरुष केदार सराफ याने आपल्या प्रगल्भ वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडवत सुवर्णपदक पटकावले.

केवळ सुवर्णपदकावरच न थांबता शाळेच्या इतर दोन विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत आपला दबदबा कायम राखला. यामध्ये इयत्ता सहावीतीलच अर्णव नीलेश पाटील आणि ध्रुव संदीप कोल्हे या विद्यार्थ्यांनी अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या अंतिम फेरीत रौप्यपदक मिळवून आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली. एकाच शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी राज्य स्तरावरील या महत्त्वाच्या परीक्षेच्या अंतिम टप्प्यात यश मिळवल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा ही केवळ एक परीक्षा नसून, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढवणे आणि त्यांच्यातील सुप्त वैज्ञानिक गुणांना वाव देण्याचे एक मोठे व्यासपीठ आहे. ही परीक्षा एकूण चार आव्हानात्मक स्तरांवर घेतली जाते, ज्यात प्रात्यक्षिक आणि सिद्धांतांचा समावेश असतो. शाळेत मिळालेले मार्गदर्शन, विज्ञानाच्या प्रयोगांसाठी उपलब्ध आधुनिक सुविधा आणि शिक्षकांनी घेतलेली मेहनत तसेच, अभ्यासातील सातत्य आणि विज्ञानाकडे पाहण्याचा चिकित्सक दृष्टिकोन यामुळे हे यश संपादन करणे सोपे झाले, अशा भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

या घवघवीत यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हाईस चेअरमन गिरीश मालपाणी आणि प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दर्जाची वैज्ञानिक दृष्टी निर्माण होत असल्याचा आनंद त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

# एसव्हीआयटीच्या तांत्रिक महोत्सवात विद्यार्थ्यांच्या संशोधन मॉडेल्सला यश




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली (सिन्नर) येथील सिंधूछाया कॅम्पमधील सर विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डतखढ) येथे आयोजित दोन दिवसीय भव्य तांत्रिक महोत्सवात महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संशोधन मॉडेल्स सादर करत उल्लेखनीय यश संपादन केले, अशी माहिती प्राचार्य डॉ. सारंग पांडे यांनी दिली.

या तांत्रिक महोत्सवात 'हॅकव्हर्स', प्रोजेक्ट स्पर्धा, बिझनेस प्लॅन कॉन्टेस्ट, पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन तसेच 'इंडियन नॉलेज सिस्टीम' अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयांतील ९०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची संधी मिळाली.

तसेच नाविन्यपूर्ण विचार मांडण्याची क्षमता, टीमवर्क, सादरीकरण कौशल्ये आणि उद्योजकतेची जाणीव विकसित झाली. उद्योग क्षेत्राशी निगडित अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या करिअर व प्लेसमेंटच्या संधींना चालना मिळाली. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून आर्य चांडोरकर, स्वरदा ओगले, मनुज चौधरी, तेजस रामटेके, ज्ञानेश्वर तिडमे, अथर्व वैकर, साहिल असलम शेख, डॉ. सतीश बोरनारे आणि अमोल साबळे यांनी काम पाहिले. तसेच या तांत्रिक महोत्सवासाठी टेनएआय कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि., नाशिक, आर३ सिस्टिम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सॉफ्टक्राउड टेक्नॉलॉजीज प्रा. लि., प्रवरा इन्फोटेक प्रा. लि., एरोबिक्स एआय प्रा. लि., नेटलीप आयटी ट्रेनिंग अँड सोल्युशन्स, वायएसएम इन्फोसोल्युशन, विझडम स्प्राउट्स आयटी ट्रेनिंग हब आदी कंपन्यांनी प्रायोजकत्व दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. सारंग पांडे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आमदार सत्यजित तांबे यांच्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे आमदार सत्यजित तांबे यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारास संगमनेर शहर व तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध प्रलंबित प्रश्न, शासकीय कामे तसेच वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात राबविण्यात आलेल्या विकासकामांचा उल्लेख करण्यात आला. सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास, दुग्ध व्यवसाय, शेती तसेच पायाभूत सुविधांमधून तालुक्याला समृद्ध करण्याचे काम थोरात यांनी केल्याचे वक्त्यांनी



सांगितले. निळवंडे धरणाचे डावे-उजवे कालवे, थेट पाईपलाईन योजना, हायटेक बसस्थानक, शहरातील विविध विकासकामे, नाशिक-पुणे महामार्ग चौपदरीकरण तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण यामुळे संगमनेरच्या विकासाला गती मिळाल्याचे सांगण्यात आले.

शांतता, सुव्यवस्था आणि बंधुभाव ही संगमनेरची ओळख असल्याचेही नमूद करण्यात आले.

## द•ख•ल

### शुक्रवारपासून श्री संत कृष्णाजी बाबा महाराजांच्या सप्ताहास प्रारंभ

**झरेकाठी** : सोनगाव पंचक्रोशीचे आराध्य दैवत श्री संत कृष्णाजी बाबा महाराजांचा सोळावा वार्षिक महासप्ताह शुक्रवार (दि. १ मे) पासून सुरू होत आहे. सप्ताहानिमित्त महाराष्ट्रातील नामांकित कथाकार हभप भाऊ पाटील (त्र्यंबकेश्वर) यांची श्रीराम चरित्र चिंतन कथा आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहादरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, काकडा भजन, हरिपाठ, अखंड वीणावादन, विष्णुसहस्रनाम जप आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. नामदेव महाराज अंत्रे व रमेश अनाप हे पारायणाचे व्यासपीठ सांभाळणार आहेत. दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत कथा महोत्सव होईल. शुक्रवार, दि. ९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता प्रेममूर्ती महंत हरीशरण गिरीजी महाराज, मठाधिपती श्रीक्षेत्र बाजाठाण यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.हा सप्ताह जिल्ह्यात प्रसिद्ध असून अनेक दानशूर भाविक व अन्नदाते यात सहभाग घेतात. भाविकांनी उपस्थित राहून कथा-कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विविध तरुण मंडळांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बाभळेश्वर येथे शेळीपालन विषयावर दोन दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण

**लोणी** : पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे मंगळवार (दि. ५ मे) पासून 'आधुनिक शेळीपालन' या विषयावर ग्रामीण युवक-युवतींसाठी दोन दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली. ग्रामीण भागातील युवक-युवतींना कृषी पूरक व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, संचालक डॉ. उत्तमराव कदम व सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होणार आहे. प्रशिक्षणात शेळ्यांच्या विविध जाती, चारा व्यवस्थापन, संगोपन, रोग नियंत्रण, लसीकरण, प्रकल्प आराखडा, मार्केटिंग, शेड उभारणी तसेच बँकिंग व शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहे. प्रत्यक्ष प्रक्षेत्र भेटीद्वारेही मार्गदर्शन केले जाणार आहे. हे प्रशिक्षण केवळ ३० प्रशिक्षणार्थ्यांसाठी मर्यादित असून इच्छुकांनी ८२०८६४२८९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दुर्गापूरच्या उपसरपंचपदी दादासाहेब रामभाऊ मनकर बिनविरोध



**लोणी** : शिर्डी मतदारसंघातील दुर्गापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विखे पाटील प्रणित जनसेवा युवा परिवर्तन मंडळाचे दादासाहेब रामभाऊ मनकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे तसेच भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांच्या नेतृत्वाखाली, लोकनियुक्त सरपंच नानासाहेब अण्णासाहेब पुलाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी पायरेन्सचे माजी अध्यक्ष एम. एम. पुलाटे, विधी तज्ञ आर. बी. पुलाटे, ट्रक वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल जाधव, ॲड. के. जी. रोकडे, छगणराव पुलाटे, सोपानराव पुलाटे, गंगाधर मनकर, मच्छींद्र जाधव, नानासाहेब गुळवे, ॲड. भाऊसाहेब पुलाटे, लक्ष्मण पुलाटे, सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब पुलाटे, ग्रामपंचायत सदस्य नबाजी हौशिराम रोकडे, सुधाकर शिवाजी पुलाटे यांच्यासह जनसेवा युवा परिवर्तन मंडळाचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या आठ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**कोपरगांव** : संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या आठ विद्यार्थ्यांची विवीध कंपन्यात आकर्षक वेतनावर नोकरीसाठी निवड झाली. विध्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज मध्ये विविध नामांकीत कंपन्यांचे अधिकारी येऊन विध्यार्थ्यांच्या मुलाखती घेत असतात. विद्यार्थ्यांची दर्जेदार तयारी, कौशल्यपूर्ण प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते निवडीसाठी पात्र ठरत असून, अंतिम निकालाच्या अगोदरच नोकरी मिळण्याचे त्यांचे स्वप्न साकार होत आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांत समाधानाचे तसेच आनंदाने वातावरण निर्माण होते आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजबध्द कामगीरीमुळे हि किमया घडते आहे. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांत फॉरेसिया इंडिया लिमिटेड कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या एकता मनोज आहेर हिची नोकरीसाठी निवड केली. आरकेएस इंजिनिअरींग सर्विसेस कंपनीने सिव्हिल इंजिनिअरींगच्या गायत्री योगेश चौधरी , श्रध्दा माणिक दिघे, दाक्षयाणी विक्रम थोरात व चैताली बाळासाहेब थोरात यांची निवड केली. मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या मयुर चंद्रकांत डागे याची हाय टेक रडिएटर्स, मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या प्रदिप अनिल जाधव याची रोबोवेल्ट सिस्टीम प्रा. लि. कंपनीने तर सिव्हील इंजिनिअरींगच्या जय महेश भोसले याची डिझाईन स्टुडिओने निवड केली. संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे व कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.


### सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रु.
पान.नं.
दि. / /२०२६.

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. २०२६

**अर्जदार**-बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव
**सामनेवाला**-सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांच्या मुलीचा तनवीर बशीर शेख यांचा जन्म दिनांक १९.१२.१९८५ मौजे शेवगाव. ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलीचा जन्म / मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही, त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या मुलीचा जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि. २९.१२.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीचा नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. /०४/२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि. /०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
**सही**
**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रु.
पान.नं.
दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. २०२६

**अर्जदार**-बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव
**सामनेवाला**-सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांच्या मुलीची तबसुम बशीर शेख यांचा जन्म दिनांक ०३.०४.१९८७ मौजे शेवगाव. ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलीची जन्म / मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नांव घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि. २९.१२.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. /०४/२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि. ०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
**सही**
**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा.रु.
पान.नं.
दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. /२०२६

**अर्जदार** -बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव
**सामनेवाला** - सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांच्या मुलीची तसलीम बशीर शेख यांचा जन्म दिनांक १८.०२.१९९० मौजे शेवगाव.ता.शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलीची जन्म / मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रागपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि. २९.१२.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. /०४/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुराधा घेऊन यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि. ०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
**सही**
**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रू.
पान.नं.
दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. /२०२६

**अर्जदार**-बशीर अहमद शेख, रा. शेवगाव ता. शेवगाव
**सामनेवाला**-सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार बशीर अहमद शेख रा. शेवगाव ता. शेवगाव जि.अहिल्यानगर यांच्या मुलाचा मुजाफर बशीर शेख यांचा जन्म दिनांक ११.०१.१९८४ मौजे शेवगाव.ता.शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलाची जन्म / मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही, त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या मुलाची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावून जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्यूची नोंद नसलेबाबत दि. २९.१२.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला

जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलाची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. /०४/२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवून त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि. /०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
**सही**
**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**



### सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रु.
पान.नं.
दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. /२०२६

**अर्जदार**-राजू रामा मडके, रा.चापडगांव
**सामनेवाला**-सरकार

सदर अर्जदार हा मौजे चापडगांव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार राजू रामा मडके, रा. चापडगांव, जि. अहिल्यानगर यांची मुलगी दिव्या राजू मडके हिचा जन्म दिनांक २०.१२.२०१३ ता. शेवगाव, जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्मचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची मुलगी दिव्या राजू मडके नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळया ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांची मुलगी दिव्या राजू मडके यांची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत कार्यालय यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म / मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत दि. ०४.०९.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार याची मुलगी दिव्या राजू मडके हिची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत दि. /०४/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दि.२८/०४/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
**सही**
**हुकुमावरुन**
**तहसिलदार शेवगाव**

## पान १ वरुन

### श्रीरामपूरच्या भूमीत ‘डीआरडीओ’चा महाप्रकल्प

नुकत्याच मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत, ’आधी शेतकऱ्यांच्या जमिनींचा निर्णय होईल आणि उरलेली जमीन प्रकल्पांसाठी दिली जाईल,’ अशी ग्वाही देण्यात आली होती. उच्च न्यायालयाचा निकाल आणि मंत्रिमंडळाच्या भूमिकेनंतरही शेतकऱ्यांचा प्रश्न प्रलंबित असताना जमिनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झाल्याने संभ्रम वाढला आहे.

........

### बंगालमध्ये भाजप बहुमताच्या उंबरठ्यावर

ममता बॅनर्जींच्या १५ वर्षांच्या राजवटीचा अंत होणार की टीएमसी पुनरागमन करणार, हा सध्याचा सर्वात मोठा राजकीय प्रश्न आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील प्रमुख पक्ष आणि आघाड्या:

एकूण जागा: २९४

बहुमत: १४८

प्रमुख पक्ष (जागा लढवणारे):

एआयटीएमसी (टीएमसी): २९१

भाजप: २९४

आयएनसी (काँग्रेस): २९२

सीपीआय(एम) + डावी आघाडी: विविध जागा

इतर लहान पक्ष (आयएसएफ, एआयएफबी, आरएसपी इत्यादी)

.............

### विधानपरिषद दिली तर शिंदेंचा पाईक म्हणून काम करु : बच्चू कडू

होता, त्यात आम्ही हरलो, असं बच्चू कडूंनी सांगितले. मला प्रस्ताव माध्यमातून कळला. मंत्री उदय सामंत यांच्यासोबत चर्चा झाली होती. एकनाथ शिंदे यांच्यासोबत भेट झाली होती. पण या विषयावर चर्चा झाली नाही. विधान परिषदसाठी अर्ज भरायाला कागदपत्र बॅगेत असतात. पण चर्चा व्हायला हवी, मुद्दे आमचे महत्वाचे आहे, असं बच्चू कडू यांनी सांगितलं. प्रहारवर अन्याय करण्याची कोणाची हिंमत नाही, कोणाची ताकद नाही. आमची लायकी नाहीये का? १ जागा मिळाली असती. पत्रकार परिषदेनंतर फोन आला तर भेटायला जाऊ, अशी प्रतिक्रियाही बच्चू कडू यांनी दिली.

विलनीकरणाबाबत चर्चा तर झाली पाहिजे, मुद्दे काय आहेत ते बघूया...किंतू-परंतू वर कशाला आत्ता बोलायचं. मी चेहऱ्यावरून आनंदी आहे. कारण नाव माझं कडू आहे, चेहरा कडू राहून कसं चालेल. एकनाथ शिंदे यांना शेतकऱ्यांचा मजूराला, दिव्यांगना जर न्याय द्यायचा असेल, त्यांच्यासाठी काम अजून करायचं असेल तर एकनाथ शिंदे यांनी निर्णय घ्यावा, एवढंच मी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सांगतो, असंही बच्चू कडू म्हणाले.

बंडावेळी शिंदे यांना दिली होती साथ - प्रहार जनशक्ती पक्षाची बच्चू कडूंकडून १९९९ ला स्थापना करण्यात आली. एकनाथ शिंदेंच्या बंडावेळी बच्चू कडूंनी साथ दिली होती. मात्र २०२४ च्या निवडणुकीत बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदेंपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २०२४ ला प्रहार जनशक्तीने ३८ जागा लढवल्या होत्या. पण सर्व जागी पराभूत त्यांचे उमेदवार पराभूत झाले. २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत प्रहार जनशक्तीला १.५५ टक्के म्हणजेच ३.०७ लाख मतं मिळाली होती.

# उक्कलगावात अवैध वाळूविरुद्ध ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे रात्री दहा वाजेनंतर मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक सुरू असून या चोरट्या मार्गाने होणाऱ्या वाळू वाहतुकीमुळे सर्वसामान्य ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या अवैध वाळू वाहतुकीमुळे गावातील अंतर्गत रस्त्यांची वाट लागली असून पाणी पातळीही झपाट्याने खाली गेली आहे. हा प्रकार त्वरित न थांबल्यास कोणत्याहीक्षणी रस्त्यावर उतरून याचा बिमोड करू, असा इशारा गावातील युवा ग्रामस्थांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

उक्कलगाव हे प्रवरा नदीकाठी वसलेले सधन गाव आहे. या गावाला परक्युलेशनसाठी प्रवरा नदी हा एकमेव सोर्स आहे. असे असताना गावातीलच काही तरूण रात्रभर अवैध मार्गाने वाळू उपसा करून त्याची अव्वा ते सव्वा दराने विक्री करत आहेत. रात्रीतून कमी श्रमात जास्त माया जमा होत असल्याने हे तरूण कुणालाही जुमानत नाहीत. दिवसेंदिवस त्यांचे मनोबल आणखीच वाढत आहे. भगत गल्ली, न्हावी आळी, व्हाया महादेव मंदिर अशी ही वाळू वाहतूक होत असल्याने उष्णतेमुळे रात्री बाहेर अंगणात झोपणाऱ्या नागरिकांनी याची धास्ती घेतली आहे. यातून एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रात्रभर या गल्लीतून वाहनांची ये-जा सुरू असल्यामुळे निर्धास्तपणे झोपता येत नाही. नदी काठालगतचया विहिरी व कूपनलिकांची पाणी पातळी कमालीची खालावली आहे. याचा परिणाम गावचे गावपण बिघडण्यात होत असून त्यातून गावची प्रतिमा मलीन होत आहे. तरी गावचे जबाबदार नागरिक म्हणून ही गोष्ट आम्हाला पटत नसल्याने सनदशिर मार्गाने आंदोलन करून याचा बिमोड करण्याचे आमच्या विचाराधीन आहे. सदर प्रकार न थांबल्यास याबाबत लवकरच संबंधितांना निवेदन देऊन कारवाईची मागणी करणार आहोत.

प्रसिध्दी पत्रकावर सोसायटीचे माजी चेअरमन व ग्रा.पं. सदस्य ड. पुरुषोत्तम थोरात, रवींद्र किशोर थोरात, भाजपचे तालुका उपाध्यक्ष व ग्रा.पं. सदस्य अनिल जनार्दन थोरात, ग्रा. पं. सदस्य शरद नानासाहेब थोरात, माजी ग्रा. पं. सदस्य विजय रत्नाकर पारखे, सामाजिक कार्यकर्ते पंडित दगडू जाधव यांच्या सह्या आहेत.

एकीकडे वारेमाप वाळू उपसा होत आहे तर दुसरीकडे घरकूल लाभार्थ्यांना वाळू मिळत नाही. घरकुलासाठी नाममात्र अनुदान असल्यामुळे चोरट्या मार्गाची महागडी वाळू घेणे त्यांच्या अवाक्याबाहेर आहे. शासनाने घरकूल लाभार्थ्यांसाठी देऊ केलेली ५ ब्रास वाळू फक्त कागदावरच असून दुसरीकडे मात्र वाळूचे डेपो लागत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# भोकर ग्रामपंचायतीला टाळे ठोकल्याप्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे मुरूम टाकल्याचे पैसे ग्रामपंचायत देत नसल्याने ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकल्याप्रकरणी रामदास उर्फ पप्पू थोरात यांच्या विरुध्द श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान थोरात यांच्यावर सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी ग्रामसेवक गणेश ढुमणे यांनी केली आहे.

भोकर येथे गेल्या चार महिन्यापूर्वी बाजारतळ येथे मुरूम टाकण्यास सांगितले, त्याप्रमाणे मुरूम टाकला परंतू त्याकामाचे पैसे मिळत नसल्याचे बघून तालुका पोलीस ठाणे, तहसिल कार्यालय, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालय यांना निवेदन देत चार दिवसात पैसे न दिल्यास ग्रामपंचायतीला टाळे ठोकून काम बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा थोरात यांनी दिला होता. मात्र, थोरात यांना पैसे न मिळाल्याने त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकून त्याचा व्हिडीओ गावातील ग्रुपवर व्हायरल केला.

ग्रामपंचायतीने तातडीने तालुका पोलीस ठाणे गाठले. तेथे या घटनेच्या वेळी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित असलेला संगणक ऑपरेटर सुजीत मोटकर यांनी तालुका पोलिसात दाखल केलेल्या फिर्यादीनुसार थोरात यांनी माझे मुरूम टाकल्याचे पैसे मिळालेले नसल्याने मी ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकणार आहे.

तुम्ही बाहेर चला असे म्हणून मला बाहेर काढून देवून पंचायतीच्या मुख्य दरवाजाला कुलूप लावले. तर दुसरीकडे गणेश दुधाळे यांनी ही रामदास उर्फ पप्पू थोरात यांनी ग्रामपंचायत कार्यालयाला बेकायदेशीररित्या कुलूप लावले व सरकारी कामात अडथळा निर्माण केला तसेच सदर इसमाने या घटनेचा फोटो व व्हिडीओ काढून गावातील ग्रुपवर व्हायरल करून ग्रामपंचायतची बदनामी केली. यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सरपंच, उपसरपंच, गणेश दुधाळे यांनी अर्जाद्वारे पोलिसांकडे केली आहे. त्यामुळे आता तालुका पोलिसांकडून पप्पू थोरात यांच्यावर कोणती कारवाई होते. याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

### बेकायदेशीर बिल

दरम्यान याबाबत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता सदरच्या कामाचा आदेश ग्रामपंचायत अधिकारी यांनी दिलेला नाही. त्यामुळे सदरचे काम हे बेकायदेशीर आहे. तसेच सदरच्या कामाचा मासिक सभा ठराव नाही. प्रशासकीय मान्यता नाही. तरी संबधीत व्यक्ती बेकायदेशीरपणे बिल मागत असल्याचे उपसरपंच गिरिष मते यांनी सांगितले.



# पाणी वापर संस्था सक्षमीकरण चर्चासत्र व कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** पाणी बचत करून शेतकऱ्यांचा भविष्यकाळ उज्वल होण्यासाठी प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा पाणी वापर संस्था सक्षमीकरण चळवळीतील कार्यकर्ते बाबुलाल पटेल यांनी व्यक्त केली.

मुळा पाटबंधारे विभाग अहिल्यानगर यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडयानिमित्ताने बुधवार दि. २९ एप्रिल रोजी अटल बिहारी वाजपेयी होमिओपॅथिक महाविद्यालय खडका फाटा ता. नेवासा येथे आयोजित पाणी वापर संस्था सक्षमीकरण चर्चासत्र व कार्यशाळेच्या अध्यस्थानावावरून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना श्री.पटेल बोलत होते.

देवगाव येथील मारुतराव घुले पाणी वापर संस्थेचे सचिव ज्ञानदेव पाडळे, घोडेगाव चे उपविभागीय अधिकारी संदीप पवार, नेवासा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अभिषेक पवार, चिलेखनवाडी उपविभागाचे उपविभागीय अधिकारी स्वप्निल देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते. चर्चासत्राच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित पाणी वापर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात बाबुलाल पटेल यांनी पाणी वापर संस्थेच्या किरकोळ अडचणी पासून ते मोठ्या प्रमाणात येणाऱ्या अडचणी कोणत्या पातळीवर सोडवल्या पाहिजेत यावर भाष्य केले. काही अडचणी स्थानिक असल्यास त्या आपआपसांमध्येच सोडवण्याचे आवाहन केले. तसेच आपआपसातील खाजगी संघर्ष पाटचाऱ्यांवर येणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पाटबंधारे विभागामार्फत ही मोठ्या प्रमाणात सहकार्य केले जाते, तेव्हा आपण पाणीबचत करून शेतकऱ्यांचा भविष्यकाळ उज्वल होण्यासाठी प्रयत्न व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

नवनाथ शिरसाठ,बाळू मरकड, अभिजित देशमुख, विकास घोक्षे, महेश कंठाळी, रवी यादव,महेश ठुबे, श्रीकांत करंजे, शिपाली चव्हाण, स्वाती साठे, कोमल शिंदे, मनीषा यादव, शांताबाई म्हस्के आदी यावेळी उपस्थित होते. कालवा निरीक्षक संतोष राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यांनी केले.

उपविभागीय अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी आभार मानले जल प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

# राहुरी तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीचे निकाल जाहीर

**राहुरी :** तालुक्यातील मानोरी, मुसळवाडी, तांदूळवाडी, खंडांबे आदी ४ ग्रामपंचायतीतील ५ जागांसाठी तर केंदळ खुर्द येथे सरपंच पदासाठी काल मतदानप्रकिया पार पडली असून काल दुपारी निकाल जाहीर करण्यात आला आहे.

यामध्ये खंडांबे येथील प्रभाग क्रमांक २ मध्ये नंदा बबन पवार व छाया मार्कस पवार यांच्यात लढत झाली असता नंदा पवार या विजयी झाल्या आहेत.

मानोरी ग्रामपंचायत प्रभाग ३ मध्ये संगिता भागवत थोरात व विजया बाबासाहेब मकासरे यांच्यात सामना होऊन संगिताथोरात निवडून आल्या आहेत. मानोरीच्या प्रभाग २ मध्ये अक्षय राजेंद्र पोटे, नामदेव आनंदा पोटे व भारत संजय जगधने यांच्यात तिरंगी लढत होऊन अक्षय पोटे यांनी विजय मिळविला आहे. मुसळवाडी ग्रामपंचायतीत लता दीपक धुमाळ व गौरी पुरुषोत्तम सूर्यवंशी यांच्या दुरंगी लढत होऊन लता तुम्हाला विजयी झाल्या आहेत तांदूळवाडीच्या प्रभाग तीन मध्ये अलका शंकर लष्करे व मनीषा बाळासाहेब तिजोरे यांच्यात सामनाहून मनीषा तिजोरी ह्या विजयी झाल्या आहेत. केंदळ खुर्द येथे सरपंच पदासाठी निकीता योगेश आढाव व अश्विनी शिवाजी शिरवळ यांच्यात सरपंच पदासाठी लढत होऊन यात निकिता आढाव या विजयी होऊन सरपंच पदाच्या मानकरी ठरल्या आहेत.

केंदळ खुर्द (सरपंचपद) निकिता योगेश आढाव (७७४) विजयी, अश्विनी शिवाजी शेजुळ (४४८). खंडांबे खुर्द नंदा बबन पवार (२८३) विजयी, छाया मार्कस पवार (१९१) मानोरी (प्र. २) अक्षय राजेंद्र पोटे (३६९) विजयी, नामदेव आनंदा पोटे (३२१), भारत संजय जगधने (१६). मानोरी (प्र. ३) संगिता भागवत थोरात (३६८) विजयी, विजया बाबासाहेब मकासरे (४९) तांदुळवाडी मनीषा बाळासाहेब तिजोरे (४३४) विजयी, अलका शंकर लष्करे (३४९). मुसळवाडी लता दीपक धुमाळ (१९०) विजयी, गौरी पुरुषोत्तम सूर्यवंशी (१५८).

# कृषी क्षेत्रातील नवोन्मेषी कार्याबद्दल संतोष गिरी यांचा सन्मान

**राहुरी :** कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय व नवोन्मेषी कार्याबद्दल संतोष गिरी यांचा पुणे येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे व कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्या हस्ते ‘तिफण कृषी पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. जालना व संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी गिरी यांनी कृषी सल्ला या उपक्रमातून विविध पिकांच्या लागवड तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शक पत्रके तयार करून ती व्हॉट्सॲपद्वारे प्रसारित केली. तसेच गावपातळीवर बैठका घेऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.कृषी विभागाचे संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी त्यांनी स्वतःच्या आवाजासह अभिनेता मिथुन चक्रवर्ती, शाहरुख खान व अमिताभ बच्चन यांच्या शैलीतील ऑडिओ संदेश तयार करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले.



# कॅन्सर हीलर सेंटरने केली नाशिकमधील नव्या केंद्राच्या उद्घाटनाची घोषणा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** मधील केंद्राच्या शुभारंभाद्वारे कॅन्सर हीलर सेंटरच्या महाराष्ट्रातील केंद्रांची संख्या पाचपर्यंत विस्तारली आहे, यामुळे नाशिक व जवळपासच्या भागांमध्ये वैयक्तिकृत, रोगप्रतिकार-केंद्री कर्करोग देखभालीची सुविधा अधिक सुलभपणे उपलब्ध होऊ शकणार आहे.

नाशिक, २९ एप्रिल २०२६: कॅन्सर हा आजार अजूनही भारताच्या सार्वजनिक आरोग्याशी निगडित सर्वात महत्त्वाच्या समस्येच्या रूपात पुढे येत आहे व त्याचबरोबर महानगरांच्या पलीकडेही सहजप्राप्त, सातत्यपूर्ण व रुग्ण-केंद्री कर्करोग देखभाल उपलब्ध होण्याची गरज अधिकच ठळकपणे लक्षात येऊ लागली आहे. आयसीएमआर-एनसीडीआयआरच्या महाराष्ट्र कॅन्सर प्रोफाइलनुसार २०२६ साली राज्यामध्ये कॅन्सरच्या १.३० लाख नवीन रुग्णांची नोंद होईल, असा अंदाज आहे, पुरुषगटात ही संख्या ६१,७०३ इतकी असून स्त्रियांमध्ये ही संख्या ६८,७६२ इतकी आहे. याच आकडेवारीमधून महाराष्ट्रामध्ये कर्करोगाशी कोणते धोकादायक घटक जोडलेले आहेत हेही अधोरेखित करण्यात आले आहे. यात तंबाखूचा वापर, अप्रत्यक्षपणे धूम्रपानाच्या सान्निध्यात येणे, लठ्ठपणा आणि आरोग्याला असलेले जीवनशैलीशी निगडित धोके यांचा समावेश आहे.

या पार्श्वभूमीवर कॅन्सर हीलर सेंटरने तिसरा मजला, सिद्धी पूजा ट्रेड सेंटर, कॉलेज रोड, बीवायके कॉलेजच्या समोर, कुलकर्णी बाग, नाशिक ४२२००५ येथे आपले नवे केंद्र सुरू केल्याची घोषणा केली आहे. हे संस्थेचे भारतातील २७वे केंद्र आहे. कर्करोगाशी निगडित विशेषीकृत सल्ला, उपचारांचे व्यक्तीबरहुकुम केलेले नियोजन आणि फॉलो अप सेवा नाशिक, उत्तर महाराष्ट्र व लगतच्या भागांत राहणाऱ्या रुग्णांच्या व कुटुंबीयांच्या समीप आणणे हा या विस्ताराचा प्रमुख हेतू आहे.

वेळीच मिळालेले मार्गदर्शन, लवकरात लवकर आलेली सुस्पष्टता आणि देखभालीत



राखले गेलेले सातत्य यामुळे सर्वच कॅन्सर रुग्णांच्या ट्रीटमेंट सायकलवर लक्षणीय प्रभाव पडू शकतो. कर्करोग उपचारांचे बरेचसे ओझे तुलनेने मोठी शहरेच वाहत असताना, नाशिकसारखी प्रादेशिक केंद्रे अत्यंत महत्त्वाची ठरू लागली आहेत. त्यामुळे ज्या रुग्णांच्या कुटुंबांना वारंवार मोठ्या शहरांकडे प्रवास न करता तज्ज्ञांकडून निर्णायक मत हवे आहे, चालू पातळीवरील देखभाल, रिपोर्ट्सचे मूल्यमापन व सहाय्यकारी देखभाल हवी आहे त्यांच्यासाठी ही उपलब्धता सोयीची ठरत आहे.

नाशिकचे केंद्र कॅन्सरच्या रुग्णविशिष्ट स्वरूपावरही लक्ष केंद्रित करेल. या उपचारांना रोगप्रतिकारशास्त्र अर्थात इम्युनोलॉजीमधील ज्ञानावर आधारित दृष्टिकोनाचा पाया असेल व त्यात मुख्यत्वे रुग्णाच्या आजाराचे स्वरूप, त्याच्या आरोग्याची स्थिती, रोगप्रतिकारशक्ती, आजवर केलेल्या उपचारांचा पूर्वेतिहास आणि एकूण जीवनमानाचा दर्जा या बाबी समजून घेण्यावर भर असेल. कॅन्सर हीलर सेंटरची कार्यपद्धती ही प्रामुख्याने कॅन्सर हीलर थेरपी या एकात्मिक कॅन्सर केअर प्रोटोकॉलच्या भोवती उभारली गेलेली आहे, जी इम्युनोथेरपी व कर्करोगाच्या उपचारांमध्ये शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीच्या प्रतिसादाला आधार देण्याच्या संकल्पनेशी अत्यंत चांगला मेळ साधणारी आहे.

या केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कॅन्सर हीलर सेंटरचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. तरंग कृष्णा म्हणाले, आज कॅन्सरची देखभाल ही फक्त आजारावरील उपचारांपुरती मर्यादित राहिलेली नाही; तर यात रुग्णाला सुस्पष्टता, आत्मविश्वास पुरविणे आणि त्यांच्या संपूर्ण उपचारांच्या कालावधीत सातत्य राखणे या गोष्टीही महत्त्वाच्या ठरत आहेत. अनेक प्रादेशिक स्तरावरील शहरांत कुटुंबांना आजही विलंबाचा सामना करावा लागतो, कारण विशेषीकृत मार्गदर्शन एकतर खूप दूर उपलब्ध असते किंवा ते मिळविणे अवघड असते. आमच्या नाशिक केंद्राच्या साथीने रुग्ण-केंद्री, इम्युनोलॉजीचे ज्ञान वापरणारी कॅन्सर देखभाल लोकांच्या जवळ आणणे हे आमचे लक्ष्य आहे, जेणेकरून त्यांना वेळच्यावेळी आधार, संरचित मार्गदर्शन आणि सहृदयतेने घेतलेला फेरआढावा वा फॉलो-अप अकारण येणाऱ्या अडथळ्यांविना मिळू शकेल.

नाशिक केंद्राच्या शुभारंभामुळे कॅन्सर हीलर सेंटरने संपूर्ण भारतातील रुग्णांसाठी कर्करोग निदानातील मार्गदर्शन अधिक सुलभ, सहानुभूतीपूर्ण आणि निरंतर उपलब्ध करून देण्याची आपली कटिबद्धता अधिक दृढ केली आहे.

## निधन वार्ता..

### ज्ञानदेव गायकवाड




**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर येथील बन मध्ये वास्तव्यास असलेले ज्ञानदेव पाडुरंग गायकवाड (वय ८२) यांचे मंगळवार, दि. २८ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ भाऊ, १ मुलगा, ३ मुली, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते एकनाथ, नामदेवराव पांडुरंग गायकवाड यांचे बंधु तसेच अनिल गायकवाड यांचे ते वडील तसेच संजय, डॉ. अविनाश, अशोक, राहुल व दीपक गायकवाड यांचे ते चुलते होत.

### चंद्रभागाबाई जाधव



**सोनई :** नेवासा तालुक्यातील शिरेगाव येथील जुन्या पिढीतील चंद्रभागाबाई विश्वास जाधव (वय ९६) यांचे नुकतेच दुःख निधन झाले आहे. त्या मोठी बाई नावाने परिचित होत्या, त्याच्या पाठीमागे एक दीर, भावजई, जावा, पुतणे, दोन मुले, एक मुलगी, नातू असा मोठा परिवार आहे, तसेच स्व प्रल्हाद जाधव यांच्या त्या भावजई होत्या व रावसाहेब जाधव, शिरेगाव सोसायटीचे चेअरमन दशरथ जाधव यांच्या मातोश्री होत. माजी सरपंच किरण जाधव यांच्या त्या आज्जी होत.

### जगन पवार



**नेवासा :** तालुक्यातील खुपटी येथील ज्येष्ठ नागरिक जगन रामा पवार (वय ८७) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, पाच मुली सूना, नातवंडे असा परिवार आहे. श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. रामभाऊ पवार व वडुले (ता.शेवगाव) येथील संत वामनभाऊ विद्यालयातील शिक्षक एकनाथ पवार यांचे ते वडील होत.

### कमलबाई गवारे



**माळवाडगाव :** शिरसगांव येथील कमलबाई बाळासाहेब गवारे ( वय ६५ ह.मु.भोकर हनुमानवाडी) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून रामभाऊ,विलास ,व अनिल गवारे यांच्या मातोश्री होत.

# वडाळा महादेव येथील शेतकऱ्याची ४८ हजारांची कॉपर केबल लंपास

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव परिसरात चोरट्यांनी एका शेतकऱ्याच्या शेतातील मोटारीची ४८ हजार रुपये किमतीची कॉपर केबल चोरून नेली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील शरद निवृत्ती पवार यांचे वडाळा महादेव शिवारात शेत आहे. रात्री अज्ञात चोरट्याने पवार यांच्या शेतातील विहिरीवर असलेल्या इलेक्ट्रिक मोटारीच्या स्टार्टर पॅनलपासून ते विहिरीच्या कठड्यापर्यंत असलेली साधारण ४८ हजार रुपये किमतीची कॉपर केबल कापून चोरून नेली. सकाळी ही चोरी झाल्याचे लक्षात आले.याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात शरद निवृत्ती पवार यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शौचालयात काढला महिलेचा व्हिडिओ; शेजाऱ्यावर गुन्हा दाखल

**गंगापूर :** शहरातील फुलेनगर परिसरात शेजाऱ्याने शौचालयात असताना ३२ वर्षीय महिलेचा मोबाईलवर चोरून व्हिडिओ काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात विनयभंग तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला पतीसह फुलेनगर परिसरात भाड्याच्या घरात वास्तव्यास आहे. त्याच ठिकाणी आरोपी अशोक बारी हा पत्नीसमवेत शेजारी राहतो. दोन्ही कुटुंबांची बाथरूम वेगवेगळी असली तरी ती एकाच पत्र्याच्या शेडखाली शेजारी-शेजारी आहेत. मंगळवारी (दि. २८ एप्रिल) सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास महिला शौचालयात गेली असता वरून आवाज आल्याने तिला संशय आला. वर पाहिल्यावर पत्र्याच्या फटीतून मोबाईल दिसल्याने ती तातडीने बाहेर आली व पतीला बोलावले. दरम्यान, शेजारच्या बाथरूममधून आरोपी बाहेर येताना त्याच्या हातात मोबाईल दिसला. पतीने मोबाईल तपासला असता महिलेचा परवानगीशिवाय काढलेला व्हिडिओ आढळून आल्याचे तक्रारीत नमूद आहे. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे करीत आहेत.


## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि.३० एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५९<br>३५७<br>५०० | ५-७ | १२४<br>१७९<br>११५ | जोड<br>५१-६७-६०-८४-७३ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १५०<br>२४०<br>३३० | ६-१ | १४६<br>२९०<br>२२७ | जोड<br>६३-७१-८०-२४-१५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १६०<br>२६८<br>४६७ | ७-६ | १६९<br>२६८<br>४६७ | जोड<br>७२-०६-१९-३४-६५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द • ख • ल



## आयुष्य सुंदर करण्यासाठी शिस्त पाळणे गरजेचे : ज्योतीताई लिंगे

**शेवगाव** : आयुष्य सुंदर करण्यासाठी शिस्त पाळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शेवगाव नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका ज्योतीताई लिंगे यांनी केले. माळीवाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी माजी सैनिक कचरदास आधाट होते. याप्रसंगी मुख्याध्यापक बलभीम मुखेकर उपमुख्याध्यापक कैलास कचरे, राजेंद्र तांगडे, सोपान लिंगे, ऋषिकेश शेकडे यांची उपस्थिती होती. यावेळी नगरसेविका लिंगे म्हणाल्या की, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे विशेष असे नाते असते. शिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टी या विद्यार्थ्यांनी अमलात आणायच्याच असतात कारण शिक्षक हा आपला मुख्य कणा असतो. त्यातूनच विद्यार्थी जीवन घडत असते. याप्रसंगी अध्यक्ष आधाट व इतरांचीही भाषणे झाली. तसेच शाळेचे शिक्षक दत्तात्रय घुले यांची बदली झाल्यामुळे त्यांचा सत्कार करून निरोप समारंभ घेण्यात आला. यावेळी नगरसेविका ज्योतीताई लिंगे व त्यांचे पती पांडुरंग लिंगे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या पेन व खाऊचे वाटप केले. शाळेची आहार व्यवस्थापन करणाऱ्या गीतांजली नांगरे रुक्मीनबाई शिंदे यांचाही सत्कार या प्रसंगी करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश शिंदे यांनी आभार मानले.

## खेळाडूंसाठी २० दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील खेळाडूंसाठी २० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी खेळासाठी दोन टप्प्यात सदर प्रशिक्षण शिबिर होणार असून, पहिला टप्पा ४ ते १३ मे आणि दुसरा टप्पा १८ मे ते २७ मे दरम्यान होणार आहे. यामध्ये अधिकाधिक खेळाडूंनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन खेळाडूंची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी, तसेच शहरी व गावपातळीवर चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी ८ ते १४ वयोगटातील व वरिष्ठ गटात सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत शिबिराचे आयोजन केले आहे. खो-खो खेळाचे शिबिर बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर व आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार आहे. बॅडमिंटन व कबड्डी खेळासाठी जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे शिबिर होईल. संभाजी राजे कुस्ती केंद्र सावेडी, तालुका क्रीडा संकुल बुऱ्हाणनगर येथे कुस्तीचे शिबिर होणार आहे.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिरात खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवावा. प्रशिक्षण शिबिराच्या अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा थरार

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील वाकोडी येथील साईदीप क्रिकेट मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेने क्रीडारसिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले असून संपूर्ण जिल्ह्यात महिला क्रिकेटचा उत्साह ओसंडून वाहत आहे. राज्यातील नामांकित महिला क्रिकेटपटूंच्या दमदार सहभागामुळे या स्पर्धेला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले आहे. मैदानावर चौकार-षटकारांचा वर्षाव, अचूक गोलंदाजी, चपळ क्षेत्ररक्षण आणि उत्कंठावर्धक सामने यामुळे क्रिकेटप्रेमींना रोमांचकारी अनुभव मिळत आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र क्रिकेट संघाची उपकर्णधार मुक्ता नगरे, आयपीएल महिला खेळाडू पूनम खेमनर, महाराष्ट्र संघातील आरती केदार, किरण नवगिरे, अंबिका वाताडे तसेच भारतीय महिला क्रिकेट क्षेत्रातील प्रसिद्ध खेळाडू किरण नवगिरे यांनी सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची प्रतिष्ठा उंचावली असून स्थानिक महिला खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू

**अहिल्यानगर** : कोतवाली पोलीस ठाण्यात घडलेल्या कथित कस्टोडियल टॉर्चर, बेकायदेशीर ताबा, अमानुष मारहाण व खंडणी प्रकरणी दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी कारवाई करावी, या मागणीसाठी सराफ सुवर्णकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब बोऱ्हाडे, अध्यक्ष उमेश बुऱ्हाडे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गणेश टाक, संपर्कप्रमुख अतुल पंडित यांच्यासह उमेश बागडे, ओंकार गडगिळे, अक्षयनाथ शहाणे, अमोल रायमोकर, लक्ष्मण दहिवाळ, गजानन शहाणे, गणेश मैड, दिलीप सिदवाडकर, प्रथमेश नगरकर, श्रीनिवास इंदपूर आदींसह राज्यभरातील सुवर्णकार व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# कृषी सेवा केंद्राच्या संपामुळे शेतकरी अडचणीत : खते औषधे मिळेनात!

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : रासायनिक खतांचे मार्जिन व लिंकिंग, खतांची विक्री करताना थेट गुन्हा दाखल करणे आणि 'साथी' ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य केल्याच्या निषेधार्थ दि. २७ एप्रिलपासून खत विक्री बंद करण्याचा निर्णय फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशने घेतला आहे.

ऐन खरीपाच्या पेरणीच्या तोंडावर खत विक्री बंद झाल्याने शेतक-यांसमोर अडचणीचा डोंगर उभा राहिला आहे.त्यावर तोडगा निघालेला असून शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइडस सीड्स डिलर्स असोसिएशन 'माफदा' यांनी सोमवारपासून बेमुदत बंदची हाक दिली आहे. 'माफदा'च्या या बंदला श्रीगोंद्यात फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनने पाठिंबा दिला आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांना होणा-या त्रासाच्या विरोधात 'माफदा'ने हा बंद पुकारला आहे.

कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सीलबंद खतांची विक्री केली तरी त्यांच्याविरोधात थेट फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाते. खत विक्रेत्या कंपन्यांकडून लिकिंगची सक्ती केली जाते. साथी ॲपचा अग्रह, बनावट एचटीबीटी बियाणे आदी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'माफदा'ने बेमुदत बंदची हाक दिली आहे. त्यास श्रीगोंद्याच्या खत विक्रेत्यांनी पाठींबा दिल्याने सोमवारी पासून खत विक्री बंद होती.



जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी युरिया व डीएपी विक्री बाबतची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत आम्ही कोणताही डीएपी व युरिया उतरवून घेणार नाही व विक्री करणार नाही, असे निवेदन जिल्हा कृषी अधिकारी यांना अहिल्यानगर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशन यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या समोर जिल्ह्यातील युरिया व डीएपी विक्री करताना येणा-या अडचणींचा पाढा वाचला. भावातील तफावत व खत विक्री बाबत स्पष्ट स्वरुपात नसलेल्या गाईडलाईन यामुळे शेतकरी ग्राहक व विक्रेते दुकानदार यांच्यात अनेकदा वाद होतात. यामुळे दुकानदारांना मनस्ताप सहन करावा लागतो.

शेतकऱ्यांना योग्य दरात व वेळेवर खत मिळावे यासाठी खत विक्रेते मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करतात तरी ही अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे व्यवसाय करणा-या दुकानदारांना विनाकारण प्रशासकीय कार्यवाहीचा सामना करुन आपला व्यवसाय करावा लागतो, असे सांगुन जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी यांनी यांनी युरिया व डीएपी विक्रीबाबतची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात दिल्यास शेतक-यांत व दुकानदारांमध्ये वाद होणार नाही.

त्याच बरोबर खतांच्या दराबाबत गैरसमज निर्माण होणार नाही. यासाठी प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा व युरिया व डीएपी विक्री बाबतची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात द्यावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे. मात्र त्यावर निर्णय झालेला असून त्यांच्या काही मागणाय मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## उष्णतेच्या तडाख्यात एसटी चालक-वाहकांच्या संरक्षणाची गरज; प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** यंदा राज्यात उन्हाचा तीव्र तडाखा वाढत असून अनेक ठिकाणी तापमान ४८ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अशा भीषण उष्णतेमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) चालक व वाहकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

एसटी बस दिवसभर उन्हात उभी राहत असल्याने बसचे पत्रे, छप्पर व आतील भाग अत्यंत तापून जातो. बसमधील खिडक्या उघड्या असल्या तरी बाहेरून येणारी गरम हवा अंगाला चटका देणारी असते. चालकाच्या केबिनजवळ इंजिन व रस्त्यावरील तापमानाचा परिणाम अधिक जाणवत असल्याने वाहन चालवताना चालकांना प्रचंड उकाडा सहन करावा लागतो. वाहकालाही तिकीट देणे, उभे राहून प्रवास करणे, प्रवाशांची गर्दी हाताळणे यामुळे त्रास सहन करावा लागतो.

चालक-वाहक हेही माणसेच आहेत. सततच्या उष्णतेमुळे उष्माघात, थकवा, चक्कर येणे, रक्तदाब वाढणे, निर्जलीकरण अशा समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या कामाच्या वेळा मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. सलग ८ तासांपेक्षा जास्त ड्युटी न देता बदली चालक-वाहकांची व्यवस्था करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

तसेच दुपारी १२ ते ४ या सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत शक्य असल्यास काही फेऱ्यांचे वेळापत्रक बदलावे किंवा आवश्यकतेनुसार कमी प्रवासी असलेल्या गाड्या तात्पुरत्या स्थगित कराव्यात. ज्या भागात तापमान अत्यंत जास्त असेल, त्या मार्गांवरील सेवांचा फेरविचार करण्याची गरज व्यक्त होत आहे.

प्रवाशांच्या सुविधेसाठी प्रत्येक बसस्थानकावर व शक्य असल्यास बसमध्ये स्वच्छ थंड पाण्याची व्यवस्था करावी. बसमध्ये पाण्याचा जार ठेवण्याचा प्रयोग करता येईल. एखाद्या प्रवाशाला किंवा कर्मचाऱ्याला अचानक त्रास झाल्यास तत्काळ मदत मिळणे आवश्यक आहे.

एसटी प्रशासनाने चालक-वाहकांसाठी टोपी, पाण्याच्या बाटल्या, ओआरएस पावडर, प्राथमिक उपचार पेटी, विश्रांती कक्ष व सावलीची व्यवस्था करावी. उन्हाळ्यातील या कठीण काळात एसटी कर्मचाऱ्यांचे आरोग्य जपणे म्हणजे प्रवाशांची सुरक्षितताही जपणे होय. राज्य शासन व एसटी महामंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावेत, अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

## स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठानकडून १० वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांना चादर-ब्लँकेट वाटप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : स्वर्गीय माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या जिल्ह्यातील १० वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांना चादर व ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या गरजांची दखल घेत हा उपक्रम राबविण्यात आला.

कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेलमध्ये प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी विविध वस्तीगृहांचे अधीक्षक व मुख्याध्यापक यांना विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले चादर व ब्लँकेटचे साहित्य पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा. शशीकांत गाडे, डॉ. विवेक भापकर, प्रा मेधताई काळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश माधवराव मुळे, उपाध्यक्ष दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डॉ महेश मुळे, डॉ. लक्ष्मण कदम, प्राचार्य हनुमंतराव कणसे, प्रा लालाचंद हराळ, मसाप जिल्हा प्रमुख प्रा गणेश भगत, महेश मुळे निलेश काळदाते, म्हस्के सुनील, यांच्यासह प्रतिष्ठानचे विश्वस्त, अनेक सदस्य, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. शशीकांत गाडे म्हणाले की, स्व. शिक्षणमहर्षी माधवराव मुळे हे केवळ एक व्यक्तिमत्व नव्हते, तर ते समाजासाठी जगणारे एक प्रेरणास्थान होते. त्यांनी आयुष्यभर समाजकारण, शिक्षण आणि दुर्बल शेतकरी घटकांच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य केले. त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची परंपरा आजही प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुढे चालू आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांचे जीवन हेच देशाचे भविष्य आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. आजच्या या चादर-ब्लँकेट उबदार कपडे वाटपासारखे उपक्रम हे केवळ मदत नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याचा एक छोटासा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. प्रतिष्ठानने आजवर अनेक सामाजिक उपक्रम मोठ्या स्वरूपात केली असून आरोग्य शिबीर ,वृक्षारोपण ,व्यवसाय मार्गदर्शन शिबिर, विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धा, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, आयोजित करून समाजामध्ये अभिनव उपक्रम राबवण्याच कार्य प्रतिष्ठान सातत्याने करत आहे प्रतिष्ठानच्या या कार्याची सर्वांनी कौतुक केले.

# भक्ती..बाजार अन् जल्लोषाचा मेळा

## निंबळक नगरी सजली खंडोबाच्या यात्रेसाठी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील निंबळक गावचे ग्रामदैवत श्री खंडोबा देवाच्या वार्षिक यात्रोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. शुक्रवार दि.१ मे रोजी यात्रोत्सवास सुरुवात होणार आहे. संपूर्ण गावात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषाने निंबळक नगरी दुमदुमू लागली आहे.

यात्रेनिमित्त श्री खंडोबा देवस्थान परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी, विद्युत रोषणाई, ध्वज पताका, भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. निंबळक गाव जिल्हा मुख्यालयाजवळ असल्याने यात्रेला परिसरातून मोठी गर्दी होत असते. खंडोबा हे महाराष्ट्रातील लोकदैवत मानले जाते. त्यामुळे खंडोबाच्या यात्रेला पारंपारिक भक्ती, नवस, बाजारपेठ, ग्राम एकजूट यांचा संगम पाहावयास मिळतो.



शुक्रवारी कावड स्वागत, महाआरती व कावड मिरवणूक पार पडणार आहे. देवाला गंगेच्या पाण्याचा जलाभिषेक सायंकाळी छबिना मिरवणूक, शोभेची दारू, स्वप्न तारका लोकगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तर शनिवारी सकाळी कलावंतांच्या हजेऱ्याचा कार्यक्रम होणार आहे. याचबरोबर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

यात्रेनिमित्त विविध खेळणी, मिठाई, पूजा साहित्य, ग्रामीण वस्तूंची दुकाने, खाद्यपदार्थांचे स्टॉल यामुळे निंबळक गाव गजबजून निघाले आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच ग्रामस्थ यात्रेच्या स्वागतासाठी सरसावले असून अनेक घरांमध्ये नातेवाईकांच्या आगमन सुरू झाले आहे. भजन, कीर्तन, जागरण गोंधळ, देवाची महापूजा असा भक्ती रसाचा दरवळ गावामध्ये पाहावयास मिळणार आहे. खंडेरायाच्या नामघोषात निंबळक पुन्हा एकदा भक्ती, परंपरा आणि ग्रामएकतेच्या रंगात न्हाऊन निघणार आहे.

या यात्रोत्सवाचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, सरपंच प्रियंका लामखडे, बाळासाहेब कोतकर, उद्योजक अजय लामखडे, भाऊराव गायकवाड, अविनाश आळंदीकर, बाळासाहेब जाजगे, प्रभाकर जाधव, भास्कर कोतकर, अशोक कोरडे, दत्तात्रय कुलट, पांडुरंग पवार यांच्यासह यात्रा उत्सव समिती व निंबळक ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ऐतिहासिक व जागृत देवस्थान !

निंबळक येथील श्री खंडोबा देवस्थान ऐतिहासिक व जागृत देवस्थान म्हणून परिचित आहे. यात्रा उत्सवानिमित्त नवसपुर्तीसाठी तसेच नवस बोलण्यासाठी मोठ्या संख्येने भक्त भाविक येत असतात. येथील यात्रोत्सव राज्यात प्रसिद्ध आहे. यात्रोत्सव काळात राज्यातील कानाकोपऱ्यातून भक्त भाविक दर्शनासाठी येत असतात.

## वयाच्या आठव्या वर्षी व्यसनाधीन शाळा बाह्य मुलाला कार्यकर्ता म्हणून ओळख दिली : संतोष भोसले

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** जे आपण सोसले ते समाजाने सोसू नये यासाठी सामाजिक कार्यात सक्रिय झालो या कामी आई-वडिलांनी शिक्षण दिले वयाच्या तेराव्या वर्षी व्यसन सोडून शाळेत दाखल झालो सामाजिक कार्यात २०१७ पासून आलो सामाजिक कार्यात पुणे येथील इको नेट संस्थेने मातीच्या गोळ्याला आकार द्यावा तसे मला घडविले. वयाच्या आठव्या वर्षी व्यसनाधीन शाळाबाह्य मुलाला कार्यकर्ता म्हणून ओळख दिली. त्याच कार्यकर्त्याचा आज सन्मान केला असे मत संतोष भोसले यांनी व्यक्त केले.

भटके विमुक्त आदिवासी समुदायामध्ये युवक नेतृत्व विकास आणि भारतीय संविधानिक मूल्यांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने २०२३ ते २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये कार्यरत असलेले आदिवासी कार्यकर्ते संतोष भोसले यांचा गौरव करण्यात आला.

प्रकल्पाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ईकोनेट, पुणे संस्थेच्या गौरीताई भोपटकर, राहुल साळवी, सुनिता देशमुख, क्रांती डबीर, स्वप्नील नेवाळे, विंदा महाजन यांच्या हस्ते संतोष भोसले यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी कार्यकर्त्यांच्या योगदानाचे कौतुक करत समाजपरिवर्तनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करण्यात आली.

संतोष भोसले यांनी आपल्या कामातून भटके विमुक्त आदिवासी समाजातील नेतृत्वाला नवी दिशा देत परिवर्तनाची प्रेरणा निर्माण केली आहे.

# पारनेर तालुक्यातील ६०० बांधकाम कामगारांना प्रमाणपत्राचे वाटप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यात इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांना गती देत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे ६०० महिला व पुरुष कामगारांना प्रमाणपत्रांचे वितरण शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमावेळी उपस्थित लाभार्थ्यांना मंडळाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच नोंदणीकृत कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, अर्ज प्रक्रिया आणि योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रमाणपत्रामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले की, पारनेर तालुक्यातील आणखी हजारो महिला कामगारांना या योजनेचा लाभ देण्यासाठी काम सुरू असून, महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी या योजनांचा व्यापक वापर केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या योजनेची व्याप्ती आणखी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या योजनेत येणाऱ्या त्रुटी बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सविस्तर निवेदन देऊन या योजनेत जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून भविष्यात शिवसेना पक्ष यासाठी कायम कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



जास्तीत जास्त कामगारांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी तालुक्यातील विविध भागांत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

या उपक्रमामुळे पारनेर तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ मिळण्यास मदत होणार असून, विशेषतः महिला कामगारांच्या सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे. तसेच जास्तीत जास्त कामगार या माध्यमातून सक्षम होणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

यावेळी पारनेर तालुका महिला अध्यक्ष कोमलताई भंडारी, जिल्हा उपप्रमुख प्रियंकाताई खिलारी, उपतालुका प्रमुख मंगलताई शेंडकर, सरपंच विमलताई झावरे, रणजित काका पाटील, सूर्यभान भालेकर, स्वप्निल राहिंज, दिलीप पाटोळे शंकर बर्वे, बाळासाहेब शिंदे, संदीप भंडारी, लक्ष्मण झावरे, मारुती उगले, बाळासाहेब झावरे, प्रसाद झावरे, चिमाजी वाळुंज, रेश्मा राजे, तोसिफ राजे, पोपटराव झावरे, प्रसाद झावरे, अशोक चेमटे, व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द • ख • ल

## राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी शाळेचा एनएमएमएसमध्ये १०० टक्के निकाल



**पुणे** : पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत संचालित राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी महाराज इंग्रजी माध्यम विद्यालय, वडगाव शेरी (मनपा शाळा क्र. ९९जी) येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून १९ पैकी सर्व १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी चार विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या परीक्षेत प्रिन्सकुमार उमेश साहा (१३३ गुण) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मोहम्मद अर्शान रईस शेख (१२९ गुण) द्वितीय, साईनाथ पांडुरंग मधासवाड (१२३ गुण) तृतीय, तर महेश्वरी जयकुमार पांडगळे (१११ गुण) यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांसाठी प्रतिमहिना एक हजार रुपये प्रमाणे एकूण ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. या यशामागे मार्गदर्शक शिक्षक स्नेहल गायकवाड, भाग्यश्री झोंड आणि विठोबा पादिर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापक अशोक लंघे यांचे अनमोल सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षकवृंदांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## फार्मर आयडी नोंदणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**पुणे** : कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला असून अद्यापही ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडीची नोंदणी केली नाही त्यांनी २० मे २०२६ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. राज्यात ग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. राज्यामध्ये एकूण १.७१ कोटी खातेदार असून यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलेले आहेत. फार्मर आयडी नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर किंवा स्वतः ही ग्रीस्टॅक पोर्टलवरून ऑनलाइन नोंदणी करावी. फार्मर आयडी नोंदणी संदर्भात कोणतीही अडचण असल्यास पुणे विभागातील शेतकऱ्यांनी सहायक कृषी अधिकारी श्रीमती संगीता ननावरे यांच्याशी ७५८८५०९४९२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## ग्राहकांच्या तक्रारीची गांर्भीयाने घेत प्राधान्याने सोडावाव्यात : अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत

**पुणे** : सर्व सामान्य ग्राहकांच्या समस्या मांडण्याचे काम जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्यावतीने करण्यात येते, ग्राहकांच्या समस्यांची गांर्भीयाने दखल घेवून त्या प्राधान्याने सोडाव्यात, ग्राहकांच्या हक्काचे उल्लंघन होणार नाही यादृष्टीने सर्व संबंधित विभागाने कार्यवाही करावी, जिल्ह्यात अशा सूचना अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय तसेच अशासकीय सदस्य, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा परिषदेचे सदस्य सचिव महेश सुधाळकर, परिवहन, महावितरण, अन्न व औषध प्रशासन आदी उपस्थित होते. श्री. राऊत म्हणाले, नागरिकांची मोठ्या प्रमाणात होणारी फसवणूक टाळण्याकरिता सायबर विभागाने व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. बिबटप्रवण क्षेत्रात विशेषत: रात्रीच्या वेळी अखंडित पुरवठा राहील, याबाबत महावितरणने कार्यवाही करावी. उर्जा मित्र बैठकीचे आयोजन करुन ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात यावे, या बैठकीत परिषदेच्या सदस्यांनी निमंत्रित करावे. सदस्य सचिवांनी या बैठकीत महसूल विभागाशी निगडीत मांडण्यात आलेले विषय जिल्हाधिकारी कार्यालय येथे दरमहा आयोजित विभाग प्रमुखाच्या बैठकीत ठेवण्यात यावे. सदस्यांनी ग्राहकांच्या सेवांबाबत मांडलेल्या सूचना विचारात घेता सकारात्क विचार करुन कार्यवाही करण्यात येईल. या सूचनांचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करुन सर्व संबंधित विभाग तसेच सदस्यांना इतिवृत्त उपलब्ध करुन द्यावे. या इतिवृत्तानुसार संबंधित विभागाने त्वरीत कार्यवाही करुन आगामी बैठकीपूर्वी अनुपालन अहवाल सादर करावा. अनुपालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. यापूर्वीचा बैठकीतही ग्राहकांच्या अडीअडचणीसंदर्भात प्राप्त निवेदनावर संबंधित विभागाना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या बैठकीत परिषदेच्या सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर सकारात्मक कार्यवाही करुन सर्व संबंधित विभागाने अनुपालन अहवाल सादर करावा, असेही श्री. राऊत म्हणाले. यावेळी परिषदेच्या सदस्यांनी ग्राहकांच्या सेवांबाबत सूचना केल्या.

# कृषीच्या शाश्वत विकासासाठी लोकभवन येथे मंथन

## कृषी आयुक्तांचे राज्यपालांसमोर सादरीकरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : लोकभवन येथे माननीय राज्यपाल यांनी बोलावलेल्या बैठकीत क्षेत्रापुढील आव्हाने, धोरणात्मक उपाययोजना आणि भविष्यातील नियोजनाबाबत कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी सविस्तर सादरीकरण केले. सुमारे तीन तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत शेतकरी आत्महत्या रोखणे, काढणीपश्चात व्यवस्थापन (Post-harvest Management) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या कळीच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीला राज्यपालांचे सचिव, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**सादरीकरणातील प्रमुख मुद्दे आणि धोरणात्मक निर्णय:**

**१. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विशेष कृती आराखडा:**

शेतकरी आत्महत्या ही राज्यापुढील गंभीर समस्या असून ती केवळ आर्थिक नाही तर सामाजिक बाबींशीही निगडित आहे. यावर मात करण्यासाठी 'मॉडेल व्हिलेज' (आदर्श गाव) संकल्पना राबवणे आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे स्रोत वैविध्यपूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

**२. 'महा-विस्तार' आणि तंत्रज्ञानाचा वापर:**

राज्यातील २ कोटी शेतकरी कुटुंबांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी 'महा-विस्तार' (AI Farmer Advisory app) आणि 'एग्री-स्टॅक' (AgriStack) यांसारख्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. माननीय राज्यपालांनी या उपक्रमांचे कौतुक करत तंत्रज्ञान थेट बांधापर्यंत पोहोचवण्याचे निर्देश दिले.

**३. काढणीपश्चात व्यवस्थापन आणि प्रक्रिया** (Value Addition):

शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी साठवणूक क्षमता वाढवणे, कोल्ड स्टोरेज साखळी मजबूत करणे आणि 'मॅग्नेट' (MAGNET) प्रकल्पाच्या माध्यमातून फलोत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यावर चर्चा झाली.

**४. नैसर्गिक शेती आणि शाश्वत विकास:**

नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत ७२,००० हेक्टर क्षेत्र रसायनमुक्त करण्याचे उद्दिष्ट असून, विद्यापीठांच्या संशोधनाचा लाभ थेट शेतकऱ्यांना मिळवून देण्यावर कुलगुरूंशी संवाद साधण्यात आला.

**माननीय राज्यपालांचे मार्गदर्शन:**

माननीय राज्यपालांनी कृषी विभागाच्या उपक्रमांचे मनापासून कौतुक केले. केवळ उत्पादन वाढवण्यापेक्षा शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे (Livelihood Improvement) हे आपले अंतिम ध्येय असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**विशेष कार्यशाळेचे नियोजन:**

शेतकरी आत्महत्या कमी करणे आणि मॉडेल व्हिलेज विकसित करणे या विषयांवर सखोल विचारमंथन करण्यासाठी माननीय राज्यपालांनी एक पूर्ण दिवसाच्या कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी इच्छुकता दर्शवली आहे. ही कार्यशाळा लवकरच आयोजित केली जाणार असून त्यात राज्यभरातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते सहभागी होतील.

**कृषी आयुक्तांचे मत:**

माननीय राज्यपालांसोबतची ही तीन तासांची चर्चा अत्यंत फलदायी ठरली. कृषी शिक्षण, संशोधन आणि प्रशासन यांच्या समन्वयातून 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे स्वप्न साकार करण्यासाठी ही बैठक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास कृषी आयुक्तांनी व्यक्त केला.

## पुरंदरच्या पूर्व भागात माळशिरस येथे चोऱ्यांचे प्रमाण वाढले

**नितीन यादव । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस** : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथे अनेक दिवसापासून मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने शेतात फारशी कामे नसल्यामुळे शेतकरी शेताकडे सकाळी किंवा संध्याकाळीच जात असतात. शेतकरी संध्याकाळी घरी आल्यानंतर रात्रीच्या वेळेस चोऱ्यां होत आहेत.

माळशिरस येथील शेतकरी नितीन यादव हे आपल्या शेतात सकाळी गेले असता स्वतः च्या विहिरीवरील पाच एचपी किर्लोस्कर कंपनीची पाण्याची मोटर चोरीला गेल्याचे पाहून थक्क झाले. सध्या या मोटारीची बाजार मूल्य किंमत ३० ते ३५ हजार रुपये आहे. ही मोटर ज्या विहिरीवर बसवली होती त्या मोटारीचा पाण्यातील हिरवा पाईप ,केबल आणि त्यावरील झाकण बाजूला फेकून देण्यात आलेले आहे. सदरची मोटर ही दुचाकी वर घेऊन गेल्याचे दिसत आहे. शेतीला पाणी देण्याचे मुख्य साधन म्हणजे पाण्याची मोटर होय ही मोटर चोरीला गेली असल्याने शेतकऱ्याने शेतीला पाणी द्यायचे कसे अशी अडचण झाली आहे.

सध्या कांदा, टोमॅटो, काकडी, कलिंगड, या उन्हाळी पिकांना बाजार भाव नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे.

## शिरूर शहरात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकवीस वाहनांवर कारवाई

### तब्बल ३१ हजार रुपयांचा दंड वसूल


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरुर** : पोलिसांनी राबवलेल्या वाहतुक नियमांचे उल्लंघन विशेष मोहिमेत वाहतूक नियम न पळणार्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात आली.काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट तसेच विना नंबर फिरणाऱ्या वाहनांविरोधात कारवाई करत एकूण २१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. शिरूर पोलीस स्टेशन हद्दीत आज दिवसभर चाललेल्या या मोहिमेत एकूण ३१ हजार रुपयांचा दंड वसुली करण्यात आली.

तसेच कारवाईदरम्यान वाहनांवरील काळ्या काचा व फॅन्सी नंबर प्लेट तत्काळ काढून टाकण्यात आल्या. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अशी कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतुकीस सहकार्य करावे, असे आवाहन शिरुर पोलीस स्टेशन कडून करण्यात आले आहे.

## धाडसी घरफोडीने कडेवाडी-चास हादरले

### दोन घरांतून सुमारे ५.५८ लाखांचा ऐवज लंपास



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यातील कडेवाडी-चास येथे पहाटेच्या सुमारास धाडसी घरफोडीची घटना घडून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरट्यांनी एकाच वेळी दोन शेजारील घरांना लक्ष्य करत तब्बल सुमारे ५ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. बबन वाळुंज यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मंगळवारी रात्री कुटुंबासह झोपल्यानंतर बुधवार (दि. २९) रोजी पहाटे अडीचच्या सुमारास त्यांना जाग आली.

घराचा दरवाजा उघडा दिसल्याने संशय आल्याने त्यांनी पाहणी केली असता कपाट उघडे, सामान अस्ताव्यस्त असल्याचे आढळले. पडवीवरील कौले काढून चोरट्यांनी घरात प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले. या घरातून सुमारे २ लाख ८३ हजार रुपयांचे दागिने व रोख रक्कम चोरीस गेली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, शेजारी राहणारे संतोष वाळुंज यांच्या घरातही याच पद्धतीने चोरी करण्यात आली. चोरट्यांनी टेरेसवरील जिन्याच्या दरवाजाची कडी उघडून घरात प्रवेश केला आणि सुमारे २ लाख ७५ हजार रुपयांचे दागिने लंपास केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. दरम्यान, ग्रामपंचायत सदस्य नितीन चासकर यांनी पोलिसांनी गस्त वाढवून आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी केली आहे. सलग दोन घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## बारामती येथे पोस्टल पेन्शन अदालतीचे आयोजन..!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : बारामती पोस्टल विभागाअंतर्गत येणाऱ्या पोस्टल पेन्शन संदर्भातील तक्रारीचे निवारण करण्यासाठी विभागीय स्तरावर ४ मे २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता पोस्टल पेन्शन अदालत चे आयोजन करण्यात आले आहे. निवृत्तीवेतनधारकांच्या लाभाशी संबंधित तक्रारी, टपाल विभागाचे सेवानिवृत्त तसेच सेवेत कार्यरत असताना मृत्यू झालेले अधिकारी व कर्मचारी, टपाल विभाग, बारामती येथील निवृत्तीधारक ज्यांचे ३ महिन्याच्या आत निपटारा झालेले नाही अशी प्रकरणांवर डाक पेन्शन अदालतीमध्ये कार्यवाही केली जाणार आहे. पेन्शन अदालतमध्ये नितिगत प्रकरण अर्थात उत्तराधिकार आदी आणि निती प्रकरणांशी संबंधित तक्रारींवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

ज्या तक्रारींची दखल पूर्वीच्या पेन्शन अदालीद्वारे घेण्यात आलेली आहे अशा तक्रारीचा पुन्हा पेन्शन अदालतीमध्ये समावेश करता येणार नाही. याबाबत नोंद घ्यावी. पुर्वीच्या पेन्शन अदालतीमध्ये ज्या तक्रारींचे दखल घेतली गेलेली नसेल अशा प्रकारच्या तक्रारीचा यात समावेश होऊ शकेल. एका तक्रार धारकाकडून एकच तक्रार लेखी स्वरूपात येणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतनधारक विहीत प्रपत्रामध्ये आपले अर्ज अधीक्षक डाकघर, बारामती विभाग, बारामती मुख्य टपाल कार्यालय इमारत, बारामती ४१३१०२ यांच्याकडे ३० एप्रिल २०२६ अखेर पाठवावे, विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार पेन्शन अदालतीमध्ये केला जाणार नाही, अशी माहिती बारामती मंडळाचे अधीक्षक डाकघर केतन शित्रे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये माहिती दिली आहे.

## बारामतीत विशाल जाधव मित्रपरिवाराचा ११ वा स्वच्छता अभियान उपक्रम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : बारामती शहर स्वच्छ, सुंदर आणि आदर्श ठेवण्याच्या उद्देशाने विशाल जाधव मित्रपरिवार यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता अभियानाचा आज सलग ११ वा शनिवार पार पडला. दर शनिवारी पहाटे ६ वाजता सुरू होणाऱ्या या उपक्रमात मित्रपरिवारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होत असून शहरातील विविध भागांत स्वच्छता केली जात आहे.

या उपक्रमामागे बारामतीच्या विकासात मोलाचे योगदान देणारे नेते अजितदादा पवार यांची प्रेरणा असल्याचे विशाल जाधव यांनी सांगितले. बारामती म्हणजे अजितदादांचा श्वास आहे आणि तो कायम स्वच्छ व सुंदर राहावा, यासाठी आम्ही हा उपक्रम सातत्याने चालू ठेवणार आहोत, अशी भावना मित्रपरिवाराच्या वतीने व्यक्त करण्यात आली. बारामती शहरात उभारण्यात आलेली विविध उद्याने, तसेच प्रशासकीय इमारतींची पाहणी करण्यासाठी अजितदादा पवार स्वतः दर शनिवारी पहाटे भेट देत असत.

त्यांच्या या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेत विशाल जाधव मित्रपरिवाराने स्वच्छतेचा हा उपक्रम हाती घेतला आहे. स्वच्छता अभियानाद्वारे रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, उद्याने परिसरातील कचरा उचलणे, झाडाझुडपांची निगा राखणे तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे यावर भर दिला जात आहे. या उपक्रमामुळे परिसरात स्वच्छतेची सवय निर्माण होत असून नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. दर शनिवारी नियमितपणे हा उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करत, ही केवळ स्वच्छता मोहीम नसून बारामती शहराविषयीची आपली जबाबदारी आहे, असेही आयोजकांनी नमूद केले.

भविष्यातही अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाच दिवस बँकिंगची मागणी

## राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यभरातील बँक अधिकाऱ्यांनी पाच दिवसांच्या बँकिंगच्या मागणीसाठी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशन च्या कार्यकारिणीची १२ एप्रिल २०२६ रोजी कोलकाता येथे झालेल्या तिसऱ्या बैठकीत सध्याच्या आंदोलनाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत आंदोलनाचे दोन मुख्य मुद्दे पुन्हा अधोरेखित करण्यात आले. त्यामध्ये पाच दिवसांचे बँकिंग हा प्रमुख आणि केंद्रस्थानी मुद्दा असून, सरकारने ही मागणी तातडीने मान्य करावी, अशी भूमिका मांडण्यात आली. तसेच वित्तीय सेवा विभाग यांनी लागू केलेल्या कार्यक्षमता आधारित प्रोत्साहन (पीएलआय) धोरणाला तीव्र विरोध व्यक्त करण्यात आला. हे धोरण भेदभाव करणारे असून अधिकारी वर्गात फूट पाडणारे व दीर्घकालीन हिताला अपायकारक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स चे समन्वयक विठ्ठल माने यांनी सांगितले की, सरकारने पाच दिवस बँकिंगची मागणी मान्य करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

संघटनेने सर्व संलग्न संघटनांना आंदोलन अधिक प्रभावी करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार सदस्यांनी नियमित कामकाजाच्या वेळेचे काटेकोर पालन करावे आणि कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त काम टाळावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कामकाजासाठी वापरल्या जाणाऱ्या अनधिकृत व्हॉट्सअॅप आणि टेलिग्राम गटांमधून बाहेर पडण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. व्हॉट्सअॅप हे अधिकृत संवाद माध्यम नसून त्याचा वापर सक्तीने करता येत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय सुट्टीच्या दिवशी आणि रविवारी काम करण्याच्या प्रयत्नांना ठाम विरोध दर्शविण्यात आला आहे.

आंदोलनाची तीव्रता आणि एकजूट कायम ठेवण्यासाठी पुढील कार्यक्रम जाहीर करण्यात आले आहेत. २ मे २०२६ (पहिला शनिवार) रोजी सर्व कर्मचाऱ्यांनी काळा बॅज लावावा, तर १६ मे २०२६ (तिसरा शनिवार) रोजी काळे कपडे परिधान करावेत. त्याच दिवशी संध्याकाळी शहरी भागात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने आयोजित करण्यात येणार असून सर्व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'कॉफी विथ विभागीय आयुक्त व सीईओ' ; गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे** : जिल्हा परिषद पुणे व ओपन लिंक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉफी विथ विभागीय आयुक्त व सीईओ' हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सैनिक शाळा व नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या यशामागील शिक्षक व पालकांच्या योगदानाचा सन्मान करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रकांत वाघमारे, ओपन लिंक फाउंडेशनच्या राज्य समन्वयक अदिती वाकळकर तसेच शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.



पुणे येथे आयोजित 'कॉफी विथ विभागीय आयुक्त व सीईओ' उपक्रमात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, राज्य समन्वयक अदिती वाकळकर व शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना.

नासा अभ्यासदौरा, एनडीए व आयआयएस शिवाजी भेट, दिल्ली दौरा तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट, 'पुणे रोबोटिक्स', 'टिंकरिंग लॅब' आणि एआर/व्हीआर लॅब यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा प्रवास मांडत भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

देशाच्या विकासात योगदान देण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण करणारा ठरत आहे.

# प्रलंबित बिलांवरून ठेकेदार आक्रमक

## १ मे पासून वीज देखभाल कामे बंद करण्याचा इशारा; महावितरणच्या कारभारावर टीका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभागाने प्रलंबित बिलांचा प्रश्न व महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, १ मे २०२६ पासून क्ढ, ड्ढ व ऊ्ढड संदर्भातील सर्व झीर्शींशपींळींश व ईशरज्ञवुप देखभाल कामे बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास हा निर्णय अमलात आणण्यात येणार असल्याचे असोसिएशनकडून स्पष्ट करण्यात आले.

असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील अनेक महिन्यांपासून विविध कामांची बिल रक्कम प्रलंबित आहे. वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले असून, कामकाज सुरळीत ठेवणे कठीण झाले आहे.




दरम्यान, महावितरणकडून ीं ठेलळप पद्धत कोणतीही स्पष्ट कार्यपद्धती (डजझ), प्रशिक्षण किंवा पूर्वसूचना न देता लागू करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या नव्या प्रणालीमध्ये कामांचे वाटप, चज/झज प्रक्रिया, बिलिंग, पेमेंट सायकल, जबाबदाऱ्या तसेच सुरक्षा नियमांविषयी कोणतीही स्पष्टता नसल्याने ठेकेदारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण आहे.

वीज पुरवठ्यावर परिणामाची शक्यता

१ मेपासून देखभाल कामे बंद राहिल्यास जिल्ह्यातील वीज पुरवठा व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो.

ग्राहकांना बसू शकतो फटका

लाईनमध्ये बिघाड झाल्यास दुरुस्तीकरिता अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध नसेल, तर वीज पुरवठा सुरळीत होण्यास विलंब होऊ शकतो. परिणामी, वीज ग्राहकांचा रोष महावितरणला सहन करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर १ मेपूर्वीच प्रलंबित बिलांचा प्रश्न निकाली काढून स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा, संभाव्य आंदोलनामुळे वीज व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शेवगाव पोलीस ठाण्यावर वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा

## ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तकाचे सामूहिक वाचन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** शेवगाव वंचित बहुजन आघाडी व समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी शेवगाव पोलीस स्टेशनवर मोर्चा काढत ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाचे सामूहिक वाचन केले. हे आंदोलन वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे आमदार संजय गायकवाड तसेच बागेश्वर महाराज यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यांचा निषेध करण्यात आला. संबंधितांविरोधात कारवाईची मागणी करत आंदोलकांनी घोषणाबाजी केली.




प्रा. किसन चव्हाण यांनी पुस्तकातील विविध संदर्भांवर भाष्य करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख राज्यकारभाराचा गौरव केला. रयतेप्रती कणव, शेतकरी व सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी, व्यापार-उद्योगांना संरक्षण, गुलाम व्यापारास बंदी, धार्मिक सहिष्णुता, मुस्लिम सरदारांचा सहभाग, स्त्रियांच्या सन्मानाचे धोरण आदी मुद्द्यांवर त्यांनी विवेचन केले.

शिवाजी महाराजांबद्दल कोणीही अपशब्द काढले तर आम्ही गप्प बसणार नाही. अठरापगड जाती, अलुतेदार-बलुतेदार, भटके, ओबीसी, आदिवासी, मुस्लिम यांचे राजे म्हणून शिवाजी महाराज सर्वसमावेशक आहेत, असे प्रा. चव्हाण म्हणाले. तसेच आमदार संजय गायकवाड यांनी राजीनामा द्यावा आणि बागेश्वर महाराज यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना ‘शिवाजी कोण होता?’ हे पुस्तक भेट देण्यात आले.

कार्यक्रमात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, वंचित बहुजन आघाडीचे शेवगाव तालुका अध्यक्ष प्यारेलाल शेख, अरुण झांबरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कल्याण भागवत, ऑगस्टीन गजभिव, बबनराव पवार, प्रमोद गजभिव, सुरेश खंडागळे, रामा खंडागळे, सलीम जिलानी, रवींद्र निळ, भीमा गायकवाड, लुकस गजभिव, गोरख तुपविहिरे, रज्जाक शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रोजच्या धावपळीत जग जिंकायला निघालेल्या जीवांना काळाने मध्येच अडवले आणि रस्ते पुन्हा एकदा निर्दयी ठरले. असे म्हणणे काही वावगे ठरणार नाहीफ

श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव आणि लोणी व्यंकनाथ येथील दोन अपघाताच्या घटनांमध्ये दोन जण जागीच ठार झाले आहेत यामध्ये पहिली घटना कोकणगाव रोडवर घडली. महावीर सर्जेराव गायकवाड (वय ३५, मूळ रा. वांगदरी, सध्या रा. सांगवी दुमाला, ता. श्रीगोंदा) हे मित्रासोबत युनिकॉर्न दुचाकीवरून (एमएच १२ एचव्ही ३६३८) रोजंदारीच्या कामासाठी गेले होते. सायंकाळी परत येत असताना कोकणगाव फाट्याजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गायकवाड यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मित्र किरकोळ जखमी झाला आहे. त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून अंत्यविधी करण्यासाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी मयताचे भाऊ हरिदास गायकवाड यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात खबर दिली असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन गाडगे करत आहेत.तर दुसरी घटना लोणी व्यंकनाथ येथील शेंडगेवाडी परिसरात घडली. सचिन रामदास जगताप यांच्या शेतात कामासाठी आलेले उत्तर प्रदेशातील कामगार संदीप राम मुरत शर्मा (रा. पंचदेवी बहराई, उत्तर प्रदेश) हे ट्रॅक्टरने मुरघासाचे काम करून घरी परत येत असताना अचानक ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघातात चालक संदीप राम मुरत शर्मा (रा. पंचदेवी बहराई, उत्तर प्रदेश) यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबत सचिन जगताप यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात माहिती दिली असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल ज्ञानदेव भागवत करत आहेत.दरम्यान, सलग घडलेल्या या दोन अपघातांमुळे तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. रस्ता हा फक्त प्रवासासाठी असतो, परीक्षा घेण्यासाठी नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. नियम पाळा, वेग आवरा कारण घरी कुणीतरी वाट पाहत असतंहा सार्वजनिक बांधकाम विभागाचा फलक काय दर्शवतो हे आतातरी चालकांच्या लक्षात येईल का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### उपमहापौर धनंजय जाधव चषक

# ३ मे रोजी जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा

## विजयी खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्यावतीने आयोजित करण्यात आली असून ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी खुली आहे.अशी माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

ही स्पर्धा रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी ९.३० वाजता नगर येथील गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे सुरू होणार आहे. स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. अंतिम निकालानुसार प्रत्येकी २ मुले व २ मुली राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी संघटनेमार्फत भरली जाणार असून राहण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

तसेच प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना उपमहापौर धनंजय जाधव करंडक देऊन गौरविण्यात येणार आहे.

ही स्पर्धा १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेल्या (१९ वर्षांखालील) खेळाडूंसाठी खुली असून सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी सोबत आणणे आवश्यक आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश ऑनलाइन किंवा व्हॉट्सॲपद्वारे स्वीकारले जात असून नोंदणीची अंतिम मुदत शनिवार, दि. २ मे रोजी सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत आहे.

अधिक माहिती व नोंदणीसाठी यशवंत बापट (९३२६०९२५०१), पारूनाथ ढोकळे (९८५०७०४२६८), मनीष जसवानी (८८५५००२३३२), प्रशांत धंगेकर (९९२१३७७९८८), देवेंद्र ढोकळे (८७००४१२६३३) व चेतन कड (७२७६६७८८९३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये प्रशिक्षणाचा पहिला भाग जनगणना प्रगनक घरोघरी!

**कर्जत :** १६ मे पासून प्रत्यक्ष जनगणना सुरू होणार असून यासाठी कर्जत पंचायत समितीमध्ये नियुक्त पर्यवेक्षक आणि प्रगणक यांचे चार टप्प्यात प्रशिक्षण सुरू आहे. याच प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून घरांची नोंदणी आणि संख्या निश्चित करण्यासाठी कर्जत शहरात प्रगणक दारोदारी भेट देत माहिती गोळा करीत आहे. यात प्रामुख्याने कर्जत नगरपंचायत आणि शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्याचा सहभाग आहे. ही जनगणना डिजिटल स्वरूपात केली जाणार आहे.

विशेष म्हणजे एक प्रश्न पूर्ण केल्याशिवाय किंवा त्याची माहिती भरल्यानंतरच दुसरा प्रश्न उपलब्ध होत असल्याची माहिती जनगणना प्रगणक यांनी दिली. सध्या प्रशिक्षणाचा डेमो म्हणून प्रगणक घरांची संख्या आणि नोंदणी करताना दिसत असले तरी वास्तविक पाहता १६ मे पासून घर यादीनुसार प्रत्यक्ष जनगणना सुरू होणार असून ती दोन टप्प्यात पूर्ण होईल.



# २०२६ जनगणनेची तयारी वेगात

## ❋ अहिल्यानगरमध्ये दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्णत्वाकडे
## ❋ शिक्षक व महापालिका कर्मचाऱ्यांना सखोल मार्गदर्शन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** देशात २०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महापालिकेच्या माध्यमातून जनगणनेच्या तयारीला वेग आला असून, दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडत आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या हॉटेल मॅनेजमेंट इमारतीमध्ये आयोजित या प्रशिक्षणात शिक्षक तसेच महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहे. महानगरपालिका समिती क्रमांक ३ अंतर्गत जनगणना अधिकारी शाम गोडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण होत आहे . प्रशिक्षक मीरा जाधव व गीतांजली जोंधळे यांनी जनगणना प्रक्रियेचे महत्त्व, माहिती संकलनाची अचूक पद्धत, नागरिकांशी संवाद कसा साधावा यासह विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करत आहे . जनगणना करताना आवश्यक असलेली दक्षता, माहितीची गोपनीयता आणि अचूकता यावर विशेष भर देण्यात येत आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण २५ ते २७ एप्रिल दरम्यान पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण २८ ते ३० एप्रिल या कालावधीत सुरू आहे. पुढील तिसरा टप्पा २ ते ४ मे दरम्यान आयोजित करण्यात येणार असून, अंतिम प्रशिक्षण ५ ते ७ मे या कालावधीत पार पडणार आहे.

यामध्ये उर्वरित प्रगणक, पर्यवेक्षक तसेच राखीव व गैरहजर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असल्याने नागरिकांनी प्रगणकांना योग्य व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जनगणना अधिकारी शाम गोडळकर यांनी केले आहे. या प्रशिक्षण सत्रासाठी कार्यालयीन कर्मचारी शाम सुदाम शिंदे व आतिफ तक्सीर शेख यांचीही उपस्थिती होती. जनगणना यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन केले असून, प्रशिक्षणाच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यावर भर दिला जात आहे.

# धिरेंद्र शास्त्री व आ. गायकवाड यांच्या विरोधात तिरडी आंदोलन

## श्रीगोंद्यात संभाजी ब्रिगेड व समविचारी संघटनांचा निषेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथे संभाजी ब्रिगेड, समविचारी संघटना आणि शिवप्रेमी यांच्यावतीने धिरेंद्र शास्त्री व आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात तिरडी आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

शनी चौक ते तहसील कार्यालय या मार्गावरून मोर्चा काढण्यात आला. यावेळी प्रतीकात्मक तिरडी बांधून ती तहसील कार्यालयाजवळ नेण्यात आली. त्यानंतर तहसील कार्यालयासमोर श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आंदोलनात मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षांनी धिरेंद्र शास्त्री व संजय गायकवाड यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे यांनीही श्रद्धांजली अर्पण करून निषेध नोंदवला.

धिरेंद्र शास्त्री (बागेश्वर महाराज) यांनी नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याचा तसेच संजय गायकवाड यांनी ‘शिवाजी कोण होता’ या पुस्तकाच्या संदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्य व कथित धमकीच्या घटनेचाही यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

या आंदोलनात बामसेफचे सुभाष बोराडे, सत्यशोधक भीमराव कोथिंबीर, आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे, संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष वैभव वनशिव, सामाजिक कार्यकर्ते बंडूतात्या जगताप, शहराध्यक्ष अभिषेक सावंत, अजिजभाई शेख, जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे, जिल्हा संघटक गणेश पारे, दीपक मखरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## द•ख•ल

### श्रीगोंद्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती कोअर कमिटी बैठक उत्साहात

**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती २०२६ ची महत्वपूर्ण कोअर कमिटी बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत सर्वानुमते समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

यामध्ये माजी उपनगराध्यक्ष राजू दादा गोरे यांची अध्यक्षपदी, विजय भैया डहाळे यांची उपाध्यक्षपदी, आदित्य भैया लोखंडे यांची सचिवपदी तर शेखर भैया मखरे यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली.

बैठकीत जयंती उत्सवानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून, संबंधित जबाबदाऱ्या पदाधिकाऱ्यांना सोपविण्यात आल्या. तसेच यंदाचा जयंती उत्सव भव्य, दिव्य आणि ऐतिहासिक स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. उत्सवामध्ये सर्व समाजघटकांचा सहभाग सुनिश्चित करून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे, उद्योजक उदयशेठ माने, दिलीप लबडे, बालू दादा मखरे, रमेश आप्पा मखरे, सुयोग धस, यशवंत पोटे, जितेंद्र पाटोळे, आरडे मेजर, बाळा काळे, दिपक मखरे तसेच कोअर कमिटी सदस्य आणि शंभूप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेवगाव तालुक्यात सोनेसांगवी व थाटेवाडगावात पिण्याच्या पाण्याची टंचाई

**हातगाव –** शेवगाव तालुक्यातील सोनेसांगवी व थाटेवाडगाव येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई सुरू झाली असून या ठिकाणी तात्काळ पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत अशा आशयाचे दोन्ही गावातून पंचायत समितीकडे प्रस्ताव दाखल झाले आहेत अशी माहिती पंचायत समितीकडून देण्यात आली आहे.तालुक्यात गेली अनेक दिवसापासून उष्णतेने मोठा कहर केला असून या वाढत्या उष्णतेमुळे जमिनीतील पाणी पातळी खालावली असल्याने व त्यातच अजूनही उष्णतेमध्ये वाढ होण्याची शक्यता दर्शविल्यामुळे तालुक्यातील नागरिक हैराण झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.सोनेसांगवी व थाटेवाडगांवं या दोन्ही गावातील पिण्याच्या पाण्याचा स्रोत तीव्र उष्णतेमुळे कमी झाला असून या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई सुरू झाली असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे दिसून येत आहे मात्र भटकंती करूनही परिसरात कुठेच पाणी उपलब्ध होत नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावें लागत आहे. तसेच अशीच उष्णतेची लाट कायम राहिल्यास अखेगाव, राक्षी, वरखेड व बेलगाव या ठिकाणीही पिण्याच्या पाण्याची टंचाई भेडसावणार असल्याने या ही ठिकाणी टँकर सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव तयार करून पंचायत समितीकडे देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. त्यातच पैठण उजवा कालव्यात पाण्याचे आवर्तन सुटले असल्यामुळे कालव्यालगत असणाऱ्या खडके, मडके, खामपिंपरी जुनी व नवीन पिंगेवाडी, हातगाव, कांबी यासह कालव्यातून पाईपलाईने पाणी नेणाऱ्या असंख्य गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे नसता या सर्वच गावातील पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव पंचायत समितीकडे दाखल झाले असते.

### सत्ता असूनही भाजप नगरसेवकांवर आंदोलनाची वेळ!

**लिंपणगाव :** नगरपरिषदेत ,राज्यात आणि केंद्रात महायुतीची सत्ता असतानाही श्रीगोंदा शहरात वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शहरातील वाड्या-वस्त्यांवर सायंकाळच्या वेळेत होत असलेल्या अघोषित लोडशेडिंगमुळे संतप्त झालेल्या भाजप नगरसेवकांनी आता आंदोलनाचा इशारा देत महावितरणच्या कारभारावर जोरदार टीका केली आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये सायंकाळी ६ ते १० या महत्त्वाच्या वेळेत दररोज वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः विद्यार्थ्यांचा अभ्यास, महिलांची स्वयंपाकाची कामे आणि शेतकऱ्यांची दूध काढण्याची वेळ याच कालावधीत येत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.यासंदर्भात नगरसेविका सौ. मनीषा आनंदकर,नगरसेविका सौ. कोमल बोरुडे, आणि नगरसेवक शहाजी खेतमाळीस यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनात संताप व्यक्त केला आहे.

### शिकण्याची वृत्तीच यशाची गुरुकिल्ली : अमित रत्नपारखी

**अहिल्यानगर :** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित ‘रिदम २घ२६’ या वार्षिक कार्यक्रमातील पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून ॲडव्होकेट श्री. वसंतराव कापरे उपस्थित होते, तर मुख्य अतिथी म्हणून श्री.अमित रत्नपारखी (मेकॅनिकल, बॅच १९९४) यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.अमित रत्नपारखी सध्या स्टरलाइट टेक्नॉलॉजिस लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथे ग्लोबल प्रोक्योरमेंट हेड म्हणून कार्यरत असून त्यांना ३० वर्षांहून अधिक औद्योगिक अनुभव आहे. त्यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. स्नेहसंमेलन समन्वयक प्रा. सुनील मांढरे तसेच या कार्यक्रमासाठी डॉ.संदीप उदावंत, प्रा. पंकज औताडे, डॉ.कानिफ मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गावरान कांदा गडगडला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला १०५० रुपये बाजारभाव जाहीर झाला असून काल गावरान कांदा ५१३६ गोण्यांची आवक झाली आहे, आवक स्थिर असून भावही कमी झाले आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली. श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत काल ५१३६ गोण्यांची आवक झाली असून कांदा नंबर एक - ९५० ते १०५० , कांदा नंबर दोन - ६५० ते ९००, कांदा नंबर तीन - ५०० ते ६००, गोल्टी - ४०० ते ८००, खाद - २०० ते ४५० असे भाव जाहीर झाले असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

# शनिशिंगणापूरात गावठी कट्टा व जिवंत काडतुसांसह युवक अटकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : शनिशिंगणापूर पोलीस ठाणे हद्दीत अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत एका युवकाला गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसांसह अटक केली. ही कारवाई सोनई-शनिशिंगणापूर रोडवरील चारी क्रमांक ४ जवळ करण्यात आली. पोलीस पथक अवैध धंद्यांवर कारवाईसाठी गस्त घालत असताना कृष्णा शिवाजी डावखर (वय २३, रा. शनिशिंगणापूर) हा गावठी कट्टा विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्या कमरेला पँटच्या आतील बाजूस सुमारे ३० हजार रुपये किमतीचा सिल्वर रंगाचा गावठी कट्टा आढळला. तसेच पँटच्या खिशातून २ हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

पोलिसांनी एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणी पोलीस हवालदार ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरून



शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बी. एन. कारखिले करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, वैभव कलुबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# कर्जफेड न केल्याने कर्जदारास एक वर्ष कारावास

## ३.२९ लाख नुकसानभरपाईचे आदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कर्ज घेतल्यानंतर ठरलेल्या वेळेत परतफेड न केल्याच्या प्रकरणात राहुरी येथील न्यायालयाने आरोपीस एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली असून ३ लाख २९ हजार नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टाकळीमिया (ता. राहुरी) येथील मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून आरोपी नानासाहेब आप्पासाहेब नालकर (रा. ताहराबाद) यांनी कर्ज घेतले होते. ठरलेल्या मुदतीत कर्जफेड न केल्याने पतसंस्थेने वारंवार पाठपुरावा केला. आरोपीने २ लाखांची काही रक्कम परत केली होती, मात्र उर्वरित थकबाकी न भरल्याने प्रकरण न्यायालयात गेले. या संदर्भात राहुरी न्यायालयात फौजदारी खटला क्रमांक ३५६/२०१९ दाखल करण्यात आला होता.

सुनावणीदरम्यान पतसंस्थेच्या वतीने साक्षीदार व आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच, आरोपीस दोन महिन्यांच्या आत पतसंस्थेला ३.२९ लाख नुकसानभरपाई अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय न्यायालयीन खर्चापोटी १० हजार देण्याचाही आदेश देण्यात आला. या प्रकरणात पतसंस्थेच्या वतीने ॲड. डी. आर. तोडमल यांनी कामकाज पाहिले. या निकालामुळे थकबाकीदारांना चपराक बसल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# नेवासा कृषी कार्यालयाचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर

## काँग्रेसचा कार्यालयास टाळे ठोकण्याचा ईशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा कृषी कार्यालयात वाढलेल्या भ्रष्टाचारा विरोधात आक्रमक भूमिका घेत आज नेवासा काँग्रेस पक्षाकडून तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयास टाळे ठोकण्याचे निवेदन देण्यात आले. नेवासा कृषी कार्यालयात मोठा भ्रष्टाचार माजला असून याबाबत तालुक्यातील शेतकऱ्यामध्ये चर्चा असून शेतकऱ्यामध्ये संताप देखील आहे. यामध्ये कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून शेती औजारे, कांदा चाळ, ट्रॅक्टर, शेततळे अस्तरीकरण असेल या साठीच्या मंजुरीसाठी कृषी कार्यालयाकडून लागणाऱ्या पूर्वसंमतीसाठी मोठी रक्कम घूस स्वरूपात शेतकऱ्याकडून घेतली जाते, अनेकवेळा उघड फोन पे वर देखील अशा रकमा घेण्यात आल्या आहे.

> शेतकऱ्यांच्या लाभाच्या विविध योजनाच्या पूर्व संमतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून पैसा उकळणे ही बाब गंभीर असून लवकरच याबाबत कठोर भूमिका घेणार शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस मैदानात उतरणार. यात सामील भ्रष्ट अधिकाऱ्यांना धडा शिकविल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही.
> **संभाजी माळवदे, प्रदेश काँग्रेस कमिटी**

या स्वरूपात मोठा भ्रष्टाचार तालुका कृषी कार्यालयाकडून करण्यात आला आहे. यात कर्मचारी व अधिकारी देखील सहभागी आहेत अधिकाऱ्याच्या वरद हस्ताने हा धंदा चालत आहे असा आरोप काँग्रेस पक्षाकडून व शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

याशिवाय तालुका कृषी कार्यालयास राज्य सरकारकडून दुरुस्तीसाठी मिळालेल्या लाखो रुपयाच्या निधीतून देखील मोठा अपहार झाल्याची देखील चर्चा आहे. दुरुस्तीच्या नावाखाली बोगस बिले काढून निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निधीतुन कोणती कामे केली यांच्या बिलाच्या पावत्यासह विवरण काँग्रेस पक्षांकडून मागविण्यात आले आहे. कृषी कार्यालयातील भ्रष्ट कारभारत सामील कर्मचारी व अधिकारी यांची तातडीने चौकशी करून काय कारवाई करणार या संदर्भात लेखी उत्तराची मागणी करण्यात आली आहे.तातडीने चौकशी केली नाही व स्पष्टीकरण दिले नाही तर काँग्रेस पक्षांकडून व शेतकऱ्यांकडून येत्या आठवड्यात तालुका कृषी कार्यलयास टाळे ठोकण्याचे निवेदन तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले आहे.

निवेदनावेळी काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, युवा नेते हरीश चक्रनारायण,उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ, संजय वाघमारे, युवा नेते संदीप केंदाळे,कैलास बोर्डे, प्रगतशील शेतकरी राहुल बेंद्रे,संजय होडगर, आदिसह शेतकरी उपस्थित होते.

# कौटुंबिक वादातून वृद्धावर अमानुष अत्याचार

## घरासह कांद्याची जाळपोळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : कौटुंबिक वादातून ७० वर्षीय वृद्धाला विवस्त्र करून लोखंडी रॉडने बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांचे घर, जनावरांचा चारा आणि शेतातील कांद्याची जाळपोळ केल्याची धक्कादायक घटना गंगापूर तालुक्यातील भालगाव शिवारात घडली. भीमराज साळुंके असे गंभीर जखमी वृद्धाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी साळुंके यांचा लहान मुलगा सचिन कांदा विक्रीसाठी गंगापूरला गेला होता. तर मोठा मुलगा अमोल हा शेतात वैरण काढत असताना जीप व दुचाकींवरून आलेल्या नऊ जणांच्या टोळक्याने साळुंके यांच्या घरावर हल्ला चढविला. भीतीपोटी अमोल, त्यांची

> **पैशांच्या वादातून हल्ल्याचा आरोप**
> सचिनची पत्नी काही महिन्यांपासून माहेरी होती. तिला सासरी पाठवणार नाही, फारकत घ्यायची आहे, त्यासाठी पैसे द्या, अशी मागणी सासरकडील मंडळींकडून होत असल्याचा आरोप फिर्यादी अमोल साळुंके यांनी केला आहे.

पत्नी अश्विनी व लहान मुले जीव वाचवण्यासाठी पळाले. गुडघेदुखीमुळे हालचाल करता न आल्याने भीमराज साळुंके घरातच अडकले.

आरोपींनी त्यांना लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्यानंतर घरासह शेतातील सुमारे १२५ क्विंटल कांदा, दोन एकर चारा, अन्नधान्य, संसारोपयोगी साहित्य आणि रोख रक्कम जाळून टाकल्याचा आरोप आहे. घटनेनंतर जखमी वृद्धाला विवस्त्र अवस्थेत फरफटत गावाच्या वेशीवर टाकून दिल्याचे सांगण्यात आले. माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक सागर शेजवळ यांनी त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी अमोल साळुंके यांच्या फिर्यादीवरून शिल्लेगाव पोलिस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# पाणीचोरी रोखण्यासाठी ‘एसडब्ल्यूएफ’ यंत्रणा महिनाभरात कार्यान्वित करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भंडारदरा धरणाच्या पाणीवाटपातील बेसुमार चोरी, बोगस संस्थांचे परवाने आणि नादुरुस्त पाणीमापक यंत्रणांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे. 'एसडब्ल्यूएफ' पाणीमापक यंत्रणेला १५ दिवसांत परवानगी देऊन, महिनाभरात ती पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, ४ ऑगस्ट १९८९ च्या शासन निर्णयाप्रमाणे (जीआर) पाणीवाटपाचे नियोजन करून नव्याने शपथपत्र दाखल करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले आहेत. शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांनी ड. अजित काळे यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली होती.

याचिकेत म्हटले आहे की, शंभर वर्षांपूर्वी बांधलेल्या भंडारदरा धरणातून ५७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. मात्र, अलीकडच्या काळात बोगस संस्था, बंद पडलेले कारखाने आणि राजकीय दबावातून सुरू असलेल्या पाणी चोरीमुळे

> भंडारदरा पाणीवाटपाबाबत हायकोर्टाचे कडक ताशेरे
> शासनाला नव्याने शपथपत्र सादर करण्याचे निर्देश
> १९८९ च्या जीआरनुसार नियोजनाचे आदेश

शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. सिंचन क्षेत्र घटले असतानाही पाण्याचे ऑडिट होत नसल्याकडे लक्ष वेधण्यात आले होते. सरकारने यापूर्वी दाखल केलेली शपथपत्रे अपूर्ण असल्याबद्दल न्या. नितीन सूर्यवंशी व न्या. वैशाली जाधव-पाटील यांच्या खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने आता पाण्याचे लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याचे आणि प्रत्येक तालुक्याच्या सुरुवातीला अचूक पाणी मोजणी यंत्रणा लावण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी जून २०२६ मध्ये होणार असून, तोपर्यंत यंत्रणा कार्यान्वित न झाल्यास सरकारला कडक कारवाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

# जागरण-गोंधळाची परंपरा ग्रामीण भागात टिकून

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : प्राचीन काळापासून विवाह समारंभ निर्विघ्नपणे पार पडावेत, यासाठी देवाला साकडे घालण्यात येतात. त्यासाठी हिंदु धर्मात कुलधर्म, कुलाचार करण्यासाठी जागरण-गोंधळाची परंपरा आजही ग्रामीण भागात टिकून आहे. कुटूंबातील व्यक्ती देव्हाऱ्यातील देव घेऊन जेजुरीला, खंडोबाला भेटून आणले किंवा घरातील कोणत्याही मुला-मुलीचे लग्न जमले, की कुलदैवत खंडोबाच्या वाघ्या-मुरळीच्या जागरणाचा व कुलदेवता तुळजाभवानीच्या गोंधळाचा कार्यक्रम करण्याची प्रथा महाराष्ट्रात शेकडो वर्षांपासून सुरु आहे. पूर्वी या जागरण-गोंधळ कार्यक्रमासाठी जेजुरीहुन वाघ्या-मुरळी येत असत. सध्या सर्वत्र लग्न सराईचा धडाका सुरू आहे.

मंगलकार्य असलेल्या घरांत कार्यारंभ करण्यापूर्वी जागरण-गोंधळ करण्याची परंपरा आहे. यात खंडोबाची तळी भरणे,



लंगर तोडून डोक्यावरील ओझे उतरविणे, दिवटी-बुधलीत रात्रभर पेटवून ठेवणे. या जागरणासाठी रात्रभर देवदेवताचे गीत गायन, पोवाडे, देवांच्या कथा सांगितल्या जातात.

जागरण-गोंधळ असेल त्या दिवशी सायंकाळी मांसाहारी किंवा शाकाहारी जेवण दिले जाते. सायंकाळी दिवट्या काढून नैवेद्य दखविण्यात येतो. रात्री दहानंतर जागरण-गोंधळ कार्यक्रमाला सुरवात होते. पहाटेच्या वेळेस लोखंडी कडी असलेल्या साखळीचे लंगर लावले जातात. ज्याच्याकडे जागरण असेल, तो लोखंडी लंगर तोडून डोक्यावरील ओझे उतरविले म्हणून मोकळा होतो. ही परंपरा ग्रामिण भागात अजुनही टिकून आहे. सध्या सर्वत्र जागरण-गोंधळाचे कार्यक्रम सुरू असल्याने वाघ्या-मुरळींना मोठी मागणी असून, त्यांचे भाव वधारलेले आहेत. काय असतं जागरण गोंधळात? जागरणामध्ये पाच पावली, तळी भरणे, कोटम भरणे, घटस्थापना, लंगरतोड, ओझं उतरवणे असे धार्मिक विधी केले जातात. तळी भरताना खंडोबाचा जयघोष केला जातो.

देवतांना आवाहन करत गण गौळण म्हटली जाते. खंडोबा, म्हाळसा, बाणाई यांचे वर्णन करणारे मल्हारी कथन केले जाते. या सर्व पात्रांची नाट्यरूपी कथा सादरीकरण वाघ्या-मुरळी करतात. जागरणाचे पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग होतात. यामध्ये खंडोबाने दैत्यांचा केलेला संहार, खंडोबा-म्हाळसेचे लग्न, खंडोबा- बाणाईचे लग्न, खंडोबा, म्हाळसा, बाणाई यांचा प्रणय प्रसंग व विरहाचे वर्णन केले जाते. याचसोबत नल-दमयंती, हरिश्चंद्र-तारामती, सत्यवान- सावित्री आदींच्या कथादेखील नाट्यरूपात सादर करतात.

लग्नसराईचा हा हंगाम खूप महत्वाचा असतो. ग्रामीण भागात कुलदैवतांचा कुलाचार पूर्ण केला जातो. श्रद्धेपोटी जागरण- गोंधळ घालणारे आणि त्यासाठी रात्रभर नृत्य करून घाम गाळणारे लोककलावंत आता मोजकेच राहिले आहेत.

# श्रीरामपूरात अंघोळ करण्यावरून तरुणावर ब्लेडने वार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरातील नॉर्दर्न बँच येथे दहाव्याच्या ओटयाजवळील पाटावर अंघोळ करण्यावरून वाद होवून एकाच्या छातीवर ब्लेडने वार करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीरामपूर शहरातील नवी दिल्ली, वॉर्ड न. २, येथील मंगेश विजू पगारे, हा दुपारी ३.३० च्या सुमारास आपण अंघोळ करण्यासाठी नॉदर्न ब्रँच येथील दहाव्याच्या ओट्याजवळ पाटावर गेला असता त्या ठिकाणी कपडे काढून अंघोळीला जात असताना तेथे त्याच्या ओळखीचे ताजू पिंजारी व भाऊ सोनू पिंजारी आले. तेव्हा ताजू म्हणाला की, तू येथे अंघोळ करू नको, आम्हाला येथे अंघोळ करायची आहे. त्यावर मंगेश त्याला म्हणाला की, मी तुमच्यापासून बाजूला जाऊन अंघोळ करतो याचा राज येवून त्यांनी जवळच पडलेले ब्लेड घेवून मंगेशच्या छातीवर मारले. त्यामुळे मंगेश जखमी होवून त्यातू रक्त येऊ लागले. तेव्हा ताजू व सोनू पिंजारी हे त्याला शिवीगाळ करत मारहाण करून परत येथे दिसला तर तुझा कार्यक्रम करू, असा दम दिला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात मंगेश पगारे याने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी ताजू उर्फ हमीद राजू पिंजारी, बाप्या उर्फ सोनू राजू पिंजारी यांच्याविरूद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# बायकोला मारहाण; पतीविरूद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील भामाठाण येथे कारण नसताना पतीने पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील भामाठाण येथे अर्चना दिलीप काळे यांनी ह्या पती, सासू, मुले यांच्याबरोबर एकत्र राहतो. तिचा पती ड्रायव्हर असून तो नेहमी दारू पिऊन आल्यावर अर्चनाशी भांडण करत असतो. सायं. ६.३० ला नवरा घरी आला व तू लई माजली असे म्हणत कारण नसताना शिवीगाळ करत मारहाण केली. तेव्हा आपण तुमचे लई झाले, मी आता मुलांसोबत माझ्या आई वडीलांकडे जाते असे म्हणाल्याचा राग येवून नवऱ्याने आपल्याला मारहाण करत चावा घेतला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अर्चना दिलीप काळे हिने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी पती दिलीप दत्तात्रय काळे याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

# घरासमोरून दुचाकीची चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरातील कांदा मार्केट जवळील प्रसाद क्रॉकरीशेजारी राहत असलेल्या घरासमोर लॉक लावून ठेवलेली युनिकॉर्न मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीरामपूर शहरातील कांदा मार्केट जवळील प्रसाद क्रॉकरीशेजारी राहत असलेले सुधाकर निवृत्ती आभाळे यांची १० हजार रू. किंमतीची युनिकॉर्न मोटारसायकल क्र. एमएच १७ सीसी ४३०० ही त्यांनी घरासमोर लॉक करून लावली. मात्र, रात्रीतून अज्ञात चोरटयाने त्यांची ही मोटारसायकल चोरून नेली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसात सुधाकर निवृत्ती आभाळे यानी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दाढ खुर्द शिवारात भरदिवसा घरफोडी;

## अल्पवयीन मुलाला धमकावून दरोडा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरीच्या सत्राने नागरिक हवालदिल झाले असून, बुधवारी (दि. २९) दाढ खुर्द शिवारात चोरट्यांनी चक्क भरदिवसा घरात घुसून एका अल्पवयीन मुलाला धाक दाखवत रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. त्यामुळे पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दाढ खुर्द शिवारातील हरणदरा परिसरात धोंडीबा जोशी यांची वस्ती आहे. बुधवारी जोशी कुटुंबातील सदस्य कामानिमित्त घराबाहेर गेले होते. दुपारी १ वाजेच्या सुमारास, जेव्हा घरात फक्त एक अल्पवयीन मुलगा होता, तेव्हा घराच्या मागील बाजूने चार अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरात अनोळखी व्यक्तींना पाहून मुलाने त्यांना हटकण्याचा प्रयत्न केला. मात्र, एका निर्दयी चोरट्याने त्या मुलाला धाक दाखवत दाबून धरले. मुलाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु, त्यांचा नाइलाज झाला. त्याच वेळी इतर तीन चोरट्यांनी घरातील कपाटांची उचकापाचक सुरू केली. या लुटीत चोरट्यांनी घरातील सुमारे दीड ते दोन लाखांची रोख रक्कम आणि साडे तीन तोळे सोन्याचे मौल्यवान दागिने असा मोठा ऐवज चोरून नेल्याचा अंदाज वर्तवला आहे. या घटनेनंतर जोशी कुटुंबीयांनी तातडीने पोलीसशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी तात्काळ हवालदार एम. एस. आहेर यांना घटनास्थळी पाठवले. तर माहिती मिळताच सरपंच सतिश जोशी यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरा याप्रकरणी तक्रार दाखल होण्याची शक्यता आहे. तसेच पोलिसांकडून पंचनामा केल्यानंतरच चोरीला गेलेल्या एकूण मुद्देमालाची नेमकी किंमत स्पष्ट होणार आहे. दरम्यान, काही दिवसांपासून आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गावांमध्ये चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. मात्र, आता चोरट्यांनी थेट दिवसाढवळ्या वस्त्यांवर येऊन लुटमार सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. पोलिसांनी या चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.